## प्रवासी जलसेवेला हिरवा कंदील

**उरण :** वादळी वाऱ्यामुळे गेटवे-एलिफंटा, गेटवे-जेएनपीए, मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस मार्गावरील जलवाहतूक बंद करण्यात आली होती. पण तीन दिवसांच्या धूमशानानंतर पावसाने विश्रांती घेतल्याने जलवाहतूक पुन्हा पूर्ववत करण्यात आली आहे. खराब हवामानामुळे विविध बंदरात खबरदारीची उपाययोजना म्हणून धोक्याचा इशारा देणारा तीन नंबरचा बावटा लावण्यात आला होता. यालमुळे काही दिवसांपासून प्रवासी जलसेवा खंडित करण्यात आली होती. त्यामुळे सागरी मार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवासी, पर्यटकांची गैरसोय होत होती. तीन नंबरचा बावटा उतरविण्यात आल्याने प्रवासी वाहतूक सुरू झाली आहे.

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २३ ऑगस्ट २०२५

किंमत ४ ₹




### वेधक

## कोकिलाबेन अंबानी रुग्णालयात

**मुंबई :** प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी आणि अनिल अंबानी यांच्या मातोश्री कोकिलाबेन अंबानी यांची प्रकृती बिघडली आहे. कोकिलाबेन अंबानी यांना एच.एन. रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. कोकिलाबेन अंबानी ९१ वर्षांच्या आहेत. कोकिलाबेन अंबानी या रिलायन्सचे संस्थापक स्वर्गीय धीरुभाई अंबानी यांच्या त्या पत्नी आहेत. अद्याप रिलायन्स किंवा अंबानी कुटुंबाकडून याबाबत कुठलीही माहिती देण्यात आलेली नाही. मात्र त्यांची प्रकृती बिघडल्याची दृश्य सोशल मीडियावर व्हायरल झाली आहेत.

## नोकरीच्या नावाखाली फसवणूक

**पनवेल :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन ऑक्टोबरमध्ये होणार असल्याने रोजगाराच्या नाव-खाली खोट्या जाहिरातींचा बाजार नवी मुंबई व पनवेलमध्ये सुरू आहे. विमानतळमध्ये नोकरी लावतो, प्रशिक्षण मिळवून देतो, असे दावे करून उमेदवारांची फसवणूक होत आहे. यामुळे रोजगाराच्या आशेने धावणाऱ्या तरुणांनी सावधान राहावे, असे आवाहन संबंधित अधिकृत कंपन्यांना करावे लागत आहे. विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटनाची तयारी सुरू असून अदानी समूह आणि सिडको यंत्रणा काम करत आहेत. प्रकल्पग्रस्तांना सेवा क्षेत्रात प्राधान्याने रोजगार मिळावा, यासाठी प्रकल्पग्रस्त २७ गाव समितीसह लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा •> पान २ वर

## अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द

**रायगड :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना शासन असाधारण राजपत्रात दि.२२ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. या प्रारूप आदेशाच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालयातील फलकावर, जिल्हा परिषद कार्यालयातील फलकावर, रायगड जिल्ह्यातील सर्व तहसिलदार व पंचायत समिती कार्यालयांच्या सूचना फलकांवर (पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, उरण, अलिबाग, मुरुड, रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर) येथे पहावयास मिळतील असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे.

### रोजगार, प्रदूषण, आरोग्य विषयांवर जेएसडब्ल्यूची

# जनसुनावणी गाजली

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**जेएसडब्ल्यूच्या प्रदुषणामुळे आरोग्य बिघडत आहे. वैद्यकीय सेवा उपलब्ध होत नाही. फक्त २५० जणांना रोजगार या प्रकल्पात देणार अशा विविध मुद्यांवर जेएसडब्ल्यूची जनसुनावणी गाजली. प्रकल्पाला विरोध नसून जेएसडब्ल्यूच्या प्रदुषणामुळे श्वसनाचे आजार होण्याचा धोका निर्माण झाला आहे. ही बाब विरोधकांनी अध्यक्षांच्या निदर्शनास आणून दिली. परंतु विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी केल्याचे दिसून आले. त्यामुळे या सुनावणीबाबत अनेकांनी नाराजी व्यक्त केली.** •> पान २ वर



**विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न**

> "तिसऱ्या टप्प्यातील जेट्टीची उभारणी सीआरझेड बाधित क्षेत्रात येत आहे. सीआरझेड नोटीफिकेशन २०१९ प्रमाणे व वन संरक्षण कायदा अधिनियम, १९८६ प्रमाणे ही जेट्टी उभारणीच्या जागेत अस्तित्वात असलेल्या हजारो कांदळवनची कत्तल होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, जेएसडब्ल्यू अस्थापना काय उपाययोजना करणार आहे. नाहीतर वरील कायद्याचे उल्लंघन होणार आहे."
>
> – अनिल पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य

**आटोपती घेतली जनसुनावणी**

जेएसडब्ल्यूच्या तिसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाबाबत पर्यावरणपुरक जनसुनावणी घेण्यात आली. या सुनावणीमध्ये प्रदुषण, रोजगार व आरोग्य या विषयांवर मोठी चर्चा झाली. अनेकांनी आपले मत व्यक्त केले. परंतु बैठकीचे अध्यक्ष, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी विरोधकांचे म्हणणे पूर्ण ऐकून न घेता ही सुनावणी आटोपती घेतली. अनेकांनी या सुनावणीबाबत नाराजी व्यक्त केली. तर काहींनीही सुनावणी बेकायदेशीर असल्याचेही सांगितले.

## शेकापच्या विविध आघाड्यांची होणार बैठक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या जिल्हा चिटणीस मंडळासह जिल्ह्यातील व तालुक्यातील विविध आघाड्यांच्या पदाधिकारी, सदस्यांची बैठक अलिबाग येथे आयोजित करण्यात आली आहे. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहात बुधवारी (दि.३) सकाळी अकरा वाजता सुरु होणार आहे.

या बैठकीत शेतकरी कामगार पक्षाचे नेते माजी आ. बाळाराम पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख अ‍ॅड. मानसी म्हात्रे, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप राज्य खजिनदार अतुल म्हात्रे, शेकाप कार्यालयीन चिटणीस अ‍ॅड. राजेंद्र कोरडे, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे आदी शेतकरी कामगार पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.


या बैठकीत पक्ष संघटना मजबूत करण्याबरोबरच पक्ष वाढीबाबत सखघेल चर्चा केली जाणार आहे. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शन करून शेतकरी कामगार पक्षाची असलेली भूमिका स्पष्ट केली जाणार आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या जिल्हा व तालुका स्तरावरील विविध आघाड्यांच्या कामकाजांचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हा व तालुका चिटणीस मंडळाचे पदाधिकारी, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, सभासद यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहवे, असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी केले आहे.

### जिल्हा परिषदेच्या शिक्षकांची

## आ. गोगावलेंकडे चाकरी

**बेकायदेशीर शिक्षक प्रतिनियुक्ती उघड**


जा.क्र.मंत्री/रोहयो.फलो.खा.भू.वि/नोट/ ९३ /२०२५
दि. २९/०१/२०२५

मंत्री
रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
दिनांक : २९/०१/२०२५

श्री.भिकाजी परशुराम मांढरे, विषय शिक्षक, शिक्षण विभाग पंचायत समिती महाड, जि. रायगड या ठिकाणी कार्यरत असून त्यांची दि. २० जानेवारी, २०२५ (म.पू) रोजी पासून माझ्या आस्थापनेवर स्वीय सहायक म्हणून उसनवारी तत्त्वावर नियुक्ती करण्यात येत आहे.

तरी श्री. भिकाजी मांढरे, विषय शिक्षक यांची माझ्या आस्थापनेवर उसनवारी तत्त्वावर नियुक्तीचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात यावे.

(भरत गोगावले)

प्रति,
मा.ना.श्री.जयकुमार गोरे,
मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज,
मंत्रालय, मुंबई-३२.

जा.क्र.मंत्री/रोहयो.फलो.खा.भू.वि/नोट/ २२ /२०२५
दि. ०५/०१/२०२५

मंत्री
रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
दिनांक : ०५/०१/२०२५.

डॉ.महेंद्र गुणाजी शिर्के, सहा. शिक्षक, रा.जि.प. केंद्रिय शाळा, कांबळे/बिरवाडी ता.महाड. जि.रायगड यांची आपल्या आस्थापनेवर उसनवारी तत्वावर दि.१६.१२.२०२४ रोजी (म.पू.) पासून स्वीय सहायक या पदावर नियुक्ती करावी व त्यांच्या सेवा माझ्या कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशी आपणांस विनंती आहे.

तरी डॉ. शिर्के यांचे नियुक्तीचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात यावेत.

(भरत गोगावले)

प्रति,
मा.ना.श्री.जयकुमार गोरे,
मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज,
मंत्रालय, मुंबई-३२.

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातील दोन प्राथमिक जिल्हा परिषद शिक्षकांची त्यांच्या शाळेतून उचल करून थेट मंत्री भरत गोगावले यांच्या कार्यालयात विशेष कार्यकारी अधिकारी व स्वीय सहायक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. नियमबाह्य झालेल्या या प्रतिनियुक्तीबद्दल ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. महाड तालुक्यातील राजिप केंद्रीय शाळा, कांबळे/बिरवाडी येथील सहाय्यक शिक्षक डॉ. महेंद्र गुणाजी शिर्के यांची १६ डिसेंबर २०२४ रोजी थेट गोगावले यांच्या कार्यालयात विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. तर महाड पंचायत समिती अंतर्गत असलेले शिक्षक भिकाजी परशुराम मंधारे यांचा उपयोग करण्यासाठी गोगावले यांनी २० जानेवारी २०२५ रोजी ग्रामीण विकासमंत्री जयकुमार गोरे यांना पत्र लिहून त्यांचे आदेश काढण्याची •> पान २ वर

## उसर येथील घरावर जेसीबी

**कष्टाने तयार केलेले घर झाले मातीमोल**


आधी | आताचे

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

उसर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीचे काम गेल्या काही महिन्यांपासून सूरू झाले आहे. या जागेच्या बाजूलाच लागून असलेल्या घरांसह गोठा व पोल्ट्री फार्म तोडण्याचे काम प्रशासनाकडून करण्यात आले. मोठ्या कष्टाने उभारलेल्या घरावर जेसीबी फिरवून काही क्षणात ते मातीमोल केले. पोलीस बळाचा वापर करीत शुक्रवारी सायंकाळी ही कारवाई करण्यात आली.

उसर येथील जानकीबाई शिंदे या वयोवृध्द महिलेचे घर गेल्या अनेक वर्षापासून त्या ठिकाणी होते. कष्टाने त्या महिलेने घर उभारले. परंतु विकासाच्या नावाखाली प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालयाला अडथळा ठरणाऱ्या या घरावर शुक्रवारी सायंकाळी जेसीबी फिरविण्यात आला. वयोवृध्द महिलेस भालचंद्र शिंदे यांनी चार सप्टेंबरपर्यंत मुदत मागून ही कारवाई पुढे •> पान २ वर

> "उसर येथील घरांसह गोठा, पोल्ट्री बेकायदेशीर दाखवून शुक्रवारी कारवाई करण्यात आली. या कारवाईबाबत न्यायालयात दाद मागितली आहे. चार सप्टेंबरला न्यायालयात सुनावणी होणार होती. म्हणून प्रशासनासह पोलिसांना विनंती करीत कारवाई थांबविण्यात यावी अशी मागणी केली. परंतु प्रशासन व पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केले. अखेर आम्ही कष्टाने उभारलेले घर, गोठे जमीनदोस्त झाले. गुरे कुठे ठेवायची असा प्रश्न निर्माण झाला असून जानकीबाई शिंदे या वयोवृध्द महिला बेघर झाल्या आहेत."
>
> – भालचंद्र शिंदे, ग्रामस्थ

## यंदा गणेशभक्तांचा प्रवास होणार सुकर

- **महामार्गावर २४ तास पोलीस तैनात**

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावर रायगड पोलिसांचे नियोजन आणि ठिकठिकाणी पर्यायी मार्ग काढून गेली अनेक वर्षापासून महामार्गावर होत असलेल्या वाहतूक कोंडीचा प्रश्न यंदाच्या वर्षी सोडविण्यासाठी रायगड पोलीस सज्ज झाले आहेत. त्यामुळे यंदाच्या वर्षी गणेशभक्तांच्या प्रवासातील विघ्न पोलिसांच्या नेटक्या नियोजनातून दूर होणार आहे.

यासाठी रायगड पोलिसांचा ताफा महामार्गावर तैनात करण्यात आला आहे. त्यामुळे गणेशभक्तांना यंदाच्या वर्षी लाडक्या गणरायाचे दर्शन वेळेवर मिळणार आहे.

माणगावात वाहतूक कोंडी होऊ नये, म्हणून खबरदारीचा उपाय म्हणून चार दिवस गणेशोत्सवापूर्वीच माणगाव बाजारपेठेतील महामार्गालगतची अतिक्रमणे हटवण्याचे मोहीम नगरपंचायत व पोलीस यांनी हाती घेतली आहे. तसेच दुभाजक बसविण्याचे काम •> पान २ वर



**पोलिसांचे नेटके नियोजन**

**गणेशभक्तांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी रायगड जिल्हा पोलीस दलामार्फत पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली ६ उपविभागीय पोलीस अधिकारी, १० पोलीस निरीक्षक, ५२ सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, ७६ वाहतूक पोलीस कर्मचारी, ४०५ पोलीस असे खारपाडा ते कशेडी घाटापर्यंत महामार्गावर पोलीस तैनात करण्यात आले आहेत. दरम्यान ठिकठिकाणी वाहतूक मदत केंद्र, १० सुविधा केंद्रे, महामार्गावर क्रेन, जेसीबी, ॲम्ब्युलन्स खाजगी व सरकारी तयार ठेवण्यात आले आहेत. तसेच स्वयंसेवक नेमण्यात आले आहेत.**

### बाळगंगा धरण प्रकल्प

## राज्य सरकारला उच्च न्यायालयाचा तडाखा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील बाळगंगा धरणाच्या बांधकामासाठी न भरलेल्या देयकांसाठी एफ. ए. एंटरप्रायजेस या कंत्राटदार कंपनीला ३०३ कोटी रुपये देण्याचा लवादाने एप्रिल २०१९ मध्ये बहुमताने दिलेला निर्णय उच्च न्यायालयाने नुकताच योग्य ठरवला.

**कंत्राटदार कंपनीला 303 कोटी द्यावेच लागणार**

कंपनीच्या बाजूने न्यायालयाने निर्णय दिल्याने सरकारला तडाखा मिळाला आहे. नवी मुंबईच्या विस्तारित क्षेत्रांना पिण्याच्या पाण्यासह औद्योगिक कारणांसाठी पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने या प्रकल्पाची आखणी करण्यात आली होती.

लवादाचा निर्णय निवृत्त न्यायमूर्ती रमेश धनुका यांच्या एकलपीठाने १९ मे २०२० रोजी रद्द केला होता व राज्य सरकार, शहर आणि •> पान २ वर




**घरमालकाने बाहेर काढल्याने मायलेक रस्त्यावर | वयोवृद्ध आई व तिच्या मुलाचा आर्त टाहो**

## पोटासाठी ७९ वर्षीय आजीला हवे काम

**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**

समाजामध्ये आहे रे आणि नाही रे असे दोन वर्ग आहेत. ज्यांच्याकडे आहे त्यांच्याकडे खूप काय आहे आणि काहींना अन्न, वस्त्र, निवारा हेसुद्धा भागवता येत नाही. मात्र त्यामध्ये अनेकांच्या अंगी स्वाभिमान अंगीकृत असतो. मदतीऐवजी ते दोन हातांना काम मागतात. याचा प्रत्यय नवीन पनवेल येथे राजीव गांधी मैदानाच्या समोर एक ७९ वर्षाची वृद्ध आई आणि ५४ वर्षाचा तिचा मुलगा या पदपथावर राहणाऱ्या मायलेकांच्या आर्त टाहोवरून गेल्या सहा महिन्यापासून अनेकांना आला. भाडे थकल्यामुळे घरमालकांनी बाहेर काढल्यानंतर आई व मुलावर ही परिस्थिती ओढवली आहे.



**मी महाडिकांची मुलगी**

**७९ व्या वर्षीदेखील खंबीर दिसत असलेल्या विमल पवार आपण साताऱ्यातील महाडिक कुटुंबात जन्माला आलो असून मराठा असल्याचे अभिमानाने सांगतात.**

८० व्या वर्षांमध्ये पदार्पण केलेल्या विमल पवार यांचा जन्म मुंबईमधील गोरेगावचा. अत्यंत सधन कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांचा विवाह मूळचे सातारा येथील मात्र मुंबईत वास्तव्य असलेल्या पवार कुटुंबात झाला. विमल यांचे पती लेखापाल म्हणून काम करत होते. तर महेश पवार हा मुलगा •> पान २ वर

**वृद्धाश्रम बंदीवास**

**पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेकजण मदत करण्याची इच्छा त्यांच्याकडे व्यक्त करतात. काही जण वृद्धाश्रमात राहण्याची व्यवस्था करतो, असेही सांगतात. पण वृद्धाश्रमातील बंदिवासात राहण्याची इच्छा आम्हाला नसल्याने तब्येतीला झेपेल असे काम मिळाल्यास त्यातून मिळणाऱ्या पगारातून भाड्याच्या घरात राहण्याची इच्छा ते व्यक्त करतात.**

**अनेकांकडून जेवणाची मदत**

**सहा महिन्यापासून फुटपाथवर राहत असल्याने अनेकजण स्वखुशीने जेवणाची आणि नाष्ट्याची सोय करत असल्याची माहितीदेखील पवार यांनी दिली असून, घर मिळवून देण्याचे आश्वासनदेखील काहींनी दिल्याची माहिती त्यांनी दिली.**

पान १ वरुन

## जनसुनावणी गाजली

पेण तालुक्यातील वडखळ-डोलवी येथील तिसऱ्या टप्प्यातील जेएसडब्ल्यू प्रकल्प आणि धरमतर पोर्ट यांच्या विस्तारीकरणासाठी पर्यावरण पुरक जनसुनावणी धरमतर जेट्टीनजीक शुक्रवारी (दि.२२) दुपारी घेण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीला दुपारी पावणे तीन वाजण्याच्या सुमारास सुरुवात झाली.जेएसडब्ल्यू कंपनीच्या प्रदुषणाचा त्रास प्रचंड होत आहे. येता-जाताना खूप त्रास होतो. दुषित वातावरणामुळे नाक दाबून प्रवास करावा लागत आहे. मात्र इतक्या वर्षात कणभरदेखील प्रदुषण कमी झाले नाही. प्रदुषण नियंत्रण मंडळाने याकडे लक्ष देणे गरजेचे होते. परंतु त्यानी त्याकडे लक्ष दिले नसल्याचे चित्र आजही आहे. या भागात हजारो तरुण बेकार आहेत. त्यांचा रोजगाराचा प्रश्न कंपनी सोडविल का असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. प्रकल्पाला विरोध नाही. परंतु येथील प्रदुषण, सीआरझेडचे उल्लंघन करून होणारी कांदळवन कत्तल याबाबत प्रशासन व शासन काय भूमिका घेणार या विषयांवर ही चर्चा गाजली. जेएसडब्ल्यूच्या तिसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाबाबत जनसुनावणी झाली. याबाबत काहींनी यापुर्वी हरकती नोंदविल्या आहेत. आज झालेल्या जनसुनावणीमध्ये प्रत्येकाचे मत ऐकण्यात आले. याचा अहवाल शासनाला पाठविला जाईल. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल, असे निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी सांगितले.

**शेतकरी संघर्ष समितीच्या हरकतीवर दृष्टीक्षेप**

हवेची गुणवत्ता दर्शविणारा डिजीटल फलक अजूनपर्यंत दर्शनी भागात लावला नाही.तो लावण्यात यावा. गेल्या अनेक वर्षापासून दुर्गंधीयुक्त वायुचा त्रास होत आहे. शरीरावर दुष्परिणाम होण्याची भिती निर्माण झाली आहे. जेएसडब्ल्यूच्या अस्थापनेच्या वाढत्या विस्तारीकरणामुळे लोहयुक्त कण हवेत मिसळत आहेत. प्रदुषण थांबविण्यासाठी उपायोजना केली जात नाही. विस्तारीकरणामुळे धरमतर खाडी व तिला जोडणाऱ्या उप खाड्या अधिक प्रदुषित झाल्या आहेत. त्याचा थेट परिणाम जमीनीवर, खाडीतील मासळीवर तसेच सभोवताली असणाऱ्या इकोसिस्टीमवर होत आहे. याचे होणारे परिणाम मानवी शरीरावर होत आहे. त्याबाबत वैज्ञानिक दृष्टीकोनातून सखोल चौकशी व्हावी, अशा अनेक विषयांवर पेझारी- शहापूर विभाग शेतकरी संघर्ष समितीने हरकती नोंदविल्या आहेत.

## उसर येथील घरावर जेसीबी

ढकलण्याची मागणी केली. परंतु घर, गुरांचा गोठा, पोल्ट्री बेकायदेशीर ठरवत सायंकाळी सुरु केली. दुपारपासूनच रेवदंडा पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले, मेडीकल कॉलेजचे प्रशासकीय कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलीस अधिकाऱ्यांना विनवणी करण्यात आली. मेडीकल कॉलेजच्या अधिष्ठता यांच्याशी संपर्क साधला. घटनास्थळी दाखल झालेले मेडिकल कॉलेजच्या कर्मचाऱ्यांना विनंती केली. तरीदेखील ना प्रशासन ना पोलीस अधिकारी ऐकण्याच्या मनस्थितीत होते. अखेर वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच अलिबाग तहसीलदार कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार संदीप जाधव यांनी घटनास्थळी जाऊन घर, गोठे तोडण्याची कारवाई सुरु केली. आठ दिवसांची मुदत मागूनही प्रशासनाने त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. प्रशासनाच्या या मनमानी कारभाराबाबत नाराजीचे सूर उमटत आहेत. याबाबत मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता यांच्याशी संपर्क साधला, असता, होऊ शकला नाही. मेडिकल कॉलेजमार्फत ही कारवाई झाली आहे. महसूल विभागाचे निवासी नायब तहसीलदार यांना पाठविण्यात आले होते. परंतु काय कारवाई केली याची पूर्ण माहिती नाही.ती माहिती मेडिकल कॉलेजच्या डीन आणि निवासी नायब तहसीलदार संदीप जाधव देतील, असे प्रांताधिकारी मुकेश चव्हाण यांनी सांगितले.

## राज्य सरकारला उच्च न्यायालयाचा तडाखा

औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) आणि कोकण सिंचन विकास महामंडळ (केआयडीसी) यांना दिलासा दिला होता. एकलपीठाच्या या निर्णयाला कंपनीने खंडपीठापुढे आव्हान दिले होते. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाने कंपनीच्या बाजूने दिलेला लवादाचा निर्णय योग्य ठरवला. तसेच, एकलपीठाचा निर्णय रद्द केला. लवादाने दिलेला निष्कर्ष हा सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या पुराव्यांच्या योग्य मूल्यांकनावर आधारित होता, असे निरीक्षणही खंडपीठाने कंपनीची याचिका ग्राह्य ठरवताना नोंदवले.कंपनीने प्रकल्पासाठी वनजमिनीशी संबंधित मंजुरी मिळवली होती. त्यामुळे, कंपनीशी केलेला करार या कारणास्तव रद्द करण्याचा निर्णय लवादाने बहुमताने दिला होता. पुराव्यांच्या आधारे घेण्यात आलेला लवादाचा दृष्टीकोन योग्य होता. परिणामी, एकलपीठाने या निर्णयात हस्तक्षेप करून तो निर्णय रद्द करण्याचा कोणताही आधारा नव्हता, असेही न्यायालयाने आदेशात नमूद केले.मे २००९ मध्ये, केआयडीसीने एफ. ए. एंटरप्रायझेसच्या नावाने ४९५ कोटी रुपयांचा कार्यादेश काढला. त्यानंतर, जून २०११ मध्ये प्रकल्पाचा खर्च १,२२० कोटी रुपयांपर्यंत गेल्याचे कंपनीने सांगितले. त्याला सिडकोने आक्षेप घेतला. त्यामुळे वाद होऊन प्रकल्पाचा नेमका खर्च निश्चित करण्यासाठी अखेर तज्ज्ञ समिती स्थापन केली गेली. बँकांकडून टाकल्या गेलेल्या सततच्या दबावामुळे, २०१३ मध्ये कंपनीने उच्च न्यायालयात धाव घेतली. कंपनीच्या याचिकेची दखल घेऊन अधिकाऱ्यांचे आणि कंपनी प्रतिनिधीचे लवाद स्थापन करण्यात आले.

## आ. गोगावलेंकडे चाकरी

विनंती करून त्यांचीही नियुक्ती स्वतःच्या कार्यालयात स्वीय सहायक म्हणून केली आहे. मात्र ग्रामीण विकास विभागाच्या नियमावलीनुसार शिक्षकांना मंत्री कार्यालयात नेमण्यास परवानगी नसल्याचे स्पष्टपणे नमूद आहे. त्यामुळे या नियुक्तीवर या विभागाने आक्षेप नोंदवला आहे. तरीदेखील गोगावले यांनी शिफारस केल्याने प्रतिनियुक्तीची प्रक्रिया पूर्ण झाली असल्याचे समोर आले. या नियुक्तीवरून शिक्षण क्षेत्रात वाद निर्माण झाला असून शिक्षकांचा शैक्षणिक कामाऐवजी राजकीय नेत्यांच्या वैयक्तिक व प्रशासकीय कामांसाठी वापर का केला जात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, या वादग्रस्त नियुक्तीवर स्पष्टीकरण देताना मंत्री भरत गोगावले यांनी सांगितले की, मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसारच अधिकारी व कर्मचारी नियुक्ती करण्याची प्रक्रिया राबवली जात आहे. अलिबागमधील सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी २०२३ मध्ये डॉ. महेंद्र गुणाजी शिर्के हे महाड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील नियमित प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत होते. मात्र डिसेंबर २०२२ रोजी तत्कालीन शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांच्या मागणीवरून त्यांची प्रतिनियुक्ती मंत्री कार्यालयात करण्यात आली होती. ही बाब उघड झाली होती. सावंत यांनी माहिती अधिकाराच्या माध्यमातून मिळवलेल्या कागदपत्रांनुसार, प्राथमिक शिक्षकांचा गैरशैक्षणिक कामांसाठी वापर केला जात असल्याचा प्रकार उघडकीस आणून चौकशीची मागणी केली होती. परंतु चौकशी सोडाच पुन्हा त्याच शिक्षकाची बेकायदेशीर प्रतिनियुक्ती झाल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. शिक्षकांच्या प्रतिनियुक्तीबाबत सध्या मला माहिती नाही. मी माहिती घेवून सांगते. त्यासाठी दोन ते तीन दिवस लागतील अशी प्रतिक्रीया राजिपच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षण अधिकारी दहितुले यांनी दिली आहे.

## यंदा गणेशभक्तांचा प्रवास होणार सुकर

चालू झाले आहे. महामार्गावरील वाहतुकीची कोंडी कसी सोडवायची हा प्रश्नच रायगड पोलिसांपुढे अनेक वर्ष उभा होता. मात्र यंदाचे वर्षी रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्गाची तसेच या मार्गाला पर्यायी रस्त्यांचा वापर करून महामार्गावरील वाहतुकीचा ताण कमी कसा करता येईल, याचे नियोजन केले आहे.

## पोटासाठी ७९ वर्षीय आजीला हवे काम

खासगी ठिकाणी कामाला होता. पतीच्या अकाली निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी आलेला महेश मिळणाऱ्या पगारावरती आपलं घर चालवत होता. मात्र अचानक नोकरी गेल्याने ते आर्थिक विवंचनेमध्ये गेले. त्यानंतर पवार हे आपल्या आईला घेऊन पनवेलमध्ये एका गावात भाड्याच्या खोलीत राहायला आले. पण येथेही हवे तसे काम न मिळाल्याने वेळेत भाडे भरणे शक्य न झाल्याने घर मालकाकडून देण्यात आलेल्या त्रासाला कंटाळून महेश यांनी आईला घेऊन वृद्धाश्रमात राहण्याचा निर्णय घेतला. वृद्धाश्रमात होणाऱ्या गैरसोईला कंटाळून तसेच घर भाडे भरण्यासाठी पैसे नसल्याने सध्या ही आई आणि लेकाची जोडी नवीन पनवेल येथील आदई सर्कल या ठिकाणी असलेल्या पदपथावर रहात आहे. विचारपूस करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांनी मदत करण्याची इच्छा दर्शवल्यास उपकार नको काम द्या, अशी मागणी ते त्यांच्याकडे करतात.

## नोकरीच्या नावाखाली फसवणूक

केला आहे. अदानी समूहाने सध्या विमानतळाच्या स्वच्छता व सुविधा विभागासाठी बीव्हीजी कंपनीची नियुक्ती केली आहे. या कंपनीमार्फतच प्रशिक्षण आणि रोजगाराची निवड होणार आहे. उमेदवारांनी खोट्या जाहिरातींना बळी पडू नये, त्याऐवजी अधिकृत संकेतस्थळावरूनच माहिती घ्यावी, असे आवाहन बीव्हीजी कंपनीने केले आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२३ ऑगस्ट

१) श्रीम. सुनिता सुरेश चव्हाण
मु.गोंधळपाडा,अलिबाग, २३-८-१९५५

२)श्री. भालचंद्र रघुनाथ पाटील
ठिकरूळनाका, अलिबाग, २३-८-१९५३


### कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**दिहान हसमुख जैन, वाढदिवस अलिबाग**

**सचिन गजराज जैन अलिबाग**


## बोध हरीपाठ

भगवान श्री ज्ञानदेवांच्या मुखातून आलेला हरिपाठ वेदांताप्रमाणे पूज्य समजावा. आपले जीवन त्यावरून ओवाळून टाकावे. शक्य असेल तेवढे हरिनाम घ्यावे.अंत:करण स्वच्छ ठेवावे. निष्कपट व्हावे.सर्व समर्थ भगवंत आपला आहे याची अंत:करणात पूर्ण खात्री बाळगावी. या सर्व बाबतीत आपण नि:संदेहअसावे. संसार ही एक कल्पना आहे. भगवंत हा प्रत्यक्ष आहे याबद्दल नि: शंक असावे

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल सौ. श्वेता योगेश घरत यांचा खाली नमूद मिळकतीमध्ये वारसाहक्काने भविष्यात निर्माण होणारा कायदेशीर हक्क आहे. सदर मिळकतीचे अद्याप सरसनिरस वाटप झालेले नाही. तसेच सदर मिळकतीमध्ये अद्याप हिस्सेवारी करण्यात आलेली नाही. सदरहू मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत असून संपूर्णतः सामाईक मिळकत आहे. आमचे अशिलांचे वडील श्री. उल्हास किसन घरत यांचे नाव आजमितीस सदर मिळकतीचे सातबारा उताऱ्यावर असून सदर एकमेव मिळकत ही शेती मिळकत म्हणून आमचे अशिलांचे वडिलांचे नावावर आहे. सदर मिळकत परस्पर विक्री झाल्यास आमचे अशिलांचे वडिलांचा शेतकरी असल्याचा दर्जा कायमस्वरूपी निघून जाईल व पर्यायाने आमचे अशिलांचा शेतकरी दर्जा देखील कायमस्वरूपी नष्ट होईल व असे झाल्यास आमचे अशिलांस भविष्यात त्यांचे नावे शेती मिळकत घेणे कायमस्वरूपी अशक्य होईल. या अनुषंगाने आमचे अशिलांचा शेतकरी दर्जा अबाधित रहावा म्हणून सदरची जाहीर नोटीस देणे अनिवार्य झालेले आहे. अशा प्रकारे आमचे अशिलांचा हक्क डावलून कोणत्याही प्रकारचा व्यवहार आमचे अशिलांचे संमतीशिवाय झाल्यास सदर खरेदीदार हा प्रामाणिक खरेदीदार होणार नाही व असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तरी तमाम लोकांस कळविण्यात येते की, खाली नमूद मिळकतीबाबत आमचे अशिलांचे शेतकरी दर्जास तसेच वारसा हक्काने भविष्यात निर्माण होणाऱ्या अधिकारांस बाधा पोहोचेल अशाप्रकारे कोणताही हक्क अथवा मालकी हस्तांतरीत करणारा दस्त नोंदविण्यात येऊ नये. तसेच त्यातील सहहिस्सेदार अथवा इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीने कोणत्याही प्रकारचे कच्च्या अथवा पक्क्या स्वरूपाचे खोदकाम अथवा बांधकाम करू नये. तसेच कोणत्याही स्वरूपाचा लिखीत अथवा अलिखीत करारनामा करू नये. तसेच आमचे अशिलांचे हक्कात बाधा येईल असे कोणतेही बेकायदेशीर कृत्य करू नये. तसे केल्यास आमचे अशिल अशा इसमांविरूद्ध आवश्यक ती दिवाणी तसेच फौजदारी कारवाई करतील.

यानुसार आमचे अशिलांचे सुचनेनुसार प्रस्तूतची जाहीर नोटीस देण्यात येत आहे. याची गांभीर्याने दखल घेण्यात यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | सासवणे | ६७/१ | ०-२१-३०<br>पो.ख. ०-००-३०<br>एकूण ०-२१-६० | ७-४७ |

हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि. २२/०८/२०२५

सही/-
अशिलांची सही
**सौ. श्वेता योगेश घरत**

सही/-
**(ॲड. तेजस्वी तळेकर)**
जिल्हा न्यायालय,
रायगड-अलिबाग



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### RFx (E-TENDER) NOTICE

MSETCL invites online bids from reputed and registered contractors of appropriate class with MSETCL. Please visit Mahatransco website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| RFx (Tender) No. | Name of work | Estimated cost in Rs. | EMD (Rs.) | Tender Fee incl. GST (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 7000037423 | Annual Maintenance Contract for Breakdown, Emergency and planned outage on 500kV Chandrapur-Padghe Bi-Pole HVDC line from Loc No.1364 to 1970 & 33 kV Anjur-Padghe Electrode line from Loc. No.1A1 to Loc No.111 under the jurisdiction of Rajgurunagar Division for the Year 2025-26. | 1,00,00,000/- | 1,00,000/- | 590/- |

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of download of RFx (e tender) documents | From- 23.08.2025 from 00.00 hrs. to 08.09.2025 up to 10.00 hrs. |
| 2 | Date of submission of RFx (e tender) | 08.09.2025 up to 10.00 hrs. |
| 3 | Date of technical bid opening | 08.09.2025 up to 11.00 hrs. (If possible) |
| 4 | Date of commercial bid opening | 08.09.2025 up to 13.00 hrs. (If possible) |

Contact Person: **The Executive Engineer (ADM),** HVDC RS (O&M) Circle, Padghe, Mob. No: 9011021483
For further details visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**HVDC RS O&M Circle, Padghe**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत जमीन मालक श्री. अनंता वाळकू चंचे व श्री. सदाशिव वाळकू चंचे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-आंभेरपाडा, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| १०२/६ | ०.६७.००<br>पो.ख. ०.०९.००<br>एकूण ०.७६.०० हे.आर.पॉ. | ०.३९ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : २३/०८/२०२५

सही/-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफिस : शॉप नं. १५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत-रायगड



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती तीचे विद्यमान मालकांकडून कायमच्या खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे- कशेळे, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| गुल दिनयार भगत | ३८ | २३ | ०.२०.०० | ०.१२ |
| जस्मिन अमिन कनाडिया | ३८ | १५ | ०.४१.०० यापैकी ०.१८.०० | ०.१५ |

सदरच्या जमीन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तद्‌ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीं संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २३/०८/२०२५

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. अशोक रामदास ताम्हाणे**
पत्ता. मु.सावळे, पो.मांडवणे,
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो.९०२२३७८४५६



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक १) श्री. विजय गणेश साठवणे, २) श्री. हेमंत मधुकर हजारे ३) श्री.महेश शरदचंद कर्णिक यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| कुरूळ | ५०/८ | ०-१९-००<br>पो.ख. ०-०२-००<br>०-२१-०० | ०.३१ |
| कुरूळ | ५०/१० | ०-७६-००<br>पो.ख. ०-०६-००<br>०-८२-०० | १.१९ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष तावेकव्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हवक, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : २३/८/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी, अलिबाग,
रायगड, ४०२ २०१.



### कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,अलिबाग
### ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
**(फक्त सभासदांसाठी)**

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,अलिबाग या संस्थेच्या सभासदांची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि.२३ ऑगस्ट २०२५ रोजी क्षात्रैक्य समाज हॉल, कुरूळ अलिबाग येथे सायंकाळी ४.३० वाजता होणार आहे. तसेच सभेपूर्वी सायं.४.०० ते ४.३० या वेळेत महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे यांच्या वतीने संस्थेचे सभासद, संचालक व सेवक वर्ग प्रशिक्षण कार्यक्रम होणार आहे.

सेक्रेटरी
**कमळ नागरी सह.पत.मर्या.अलिबाग**



### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे श्रीबाग नं. २, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक कामरान शमशाद अन्सारी रा. घर नं. ४२५अ, नवेनगर, कुरुळ, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्या नांवे असलेली मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे व तसा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | भूखंड नं. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| श्रीबाग नं. २ ता. अलिबाग | २५/१,२५/२ व २६ | ई २९ | ५०.०० |

वर नमूद संपूर्ण मिळकत व त्या मिळकतीवरील अलिबाग नगरपरिषद हद्दीतील पूर्वीचा घर नं. २४ अ, जुना मालमत्ता क्र. Z1ASB202567, नवीन मालमत्ता क्र. ALB000002545 यासह.

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून पंधरा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २३/०८/२०२५

सही/-
**नईम मुजम्मील सैय्यद**
पत्ता : रा. मांडवी मोहल्ला, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं.८६९८९६३१०१



### जाहीर नोटीस

अर्ज क्र. ३११ /२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. सिताराम तांबड्या उर्फ तांबडे हिलम
वय ५४ वर्षे, धंदा : मोलमजुरी,
रा. कोशिंबळे तर्फ निजामपूर, आदिवासी वाडी, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत दाखणे,
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड,

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. सिताराम तांबड्या उर्फ तांबडे हिलम यांचे वडील कै. तांबड्या चंद्रया हिलम हे दि. ०४/०२/२०१४ रोजी मौजे कोशिंबळे तर्फे निजामपूर, आदिवासी वाडी, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले आहेत. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १३/०८/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे वडील कै. तांबडया चंद्रया हिलम हे दि. ०४/०२/२०१४ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. सिताराम तांबड्या उर्फ तांबडे हिलम यांचे वडील कै. तांबड्या चंद्रया हिलम हे दि. ०४/०२/२०१४ रोजी मौजे कोशिंबळे तर्फे निजामपूर, आदिवासी वाडी, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव
ता. : २२/०८/२०२५

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**



### ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड
### जाहीर नोटीस

**दि.२२/०८/२०२५**
**जा.क्र.७४४/२०२५**

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतराणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. क्रं. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ३ | ११६० | गोकुळनगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम घर | सौ.कांता एकनाथ मुळीक | एकनाथ अर्जुन मुळीक<br>सागर एकनाथ मुळीक<br>जयवंत एकनाथ मुळीक |
| २ | ५ | ५९१/३,८७५ | पिंपळभाट | पक्के सिमेंट बांधकाम दुकानगाळा व घर | सुगंधा सुभाष नागवेकर | सुगंधा सुभाष नागवेकर<br>धनश्री सुभाष नागवेकर |
| ३ | २ | १११९/८ | सुमंगल सोसा, | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम पहिला मजला सदनिका ४८२ चौ.फुट | दिलीप दामोदर जाधव | सिद्धेश दिलीप जाधव |
| ४ | ४ | १११४ | विद्यानगर पुर्व | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम घर | अपर्णा अशोक म्हात्रे | अपर्णा अशोक म्हात्रे<br>अविष्कार अशोक म्हात्रे |
| ५ | ४ | २०४२ | शिवनगर दळीबाग रस्ता | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम घर | सरिता सतिश कोठावळे | सारिका सुशांत करडेळे |
| ६ | २ | १७८०/२ | बालाजी टॉवर सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम पहिला मजला ३७७ चौ.फुट | प्रियांका संतोष शिंदे<br>संतोष बाबजीराव शिंदे | प्रज्ञा श्रीपाद पाटील,<br>श्रीपाद जयवंत पाटील |
| ७ | ५ | १५७९/१४ | कृष्णदर्शन सोसा सी विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम दुसरा मजला ८३५ चौ.फुट | देवेश चंद्रकांत तिवारी | रेखा नरेश पुरोहित,<br>नरेश हरिश्चंद्र पुरोहित |
| ८ | ४ | १५५१/५ | स्वानंद सोसायटी | आर.सी.सी.पक्के बांधकाम दुसरा मजला सदनिका ९८५ चौ.फुट | झुंझार पा परदेशी<br>अंकिता झुंझार परदेशी | दिपक अशोक सुर्यवंशी |
| ९ | ४ | ५०८/६ | कुसूम सोसा | आर.सी.सी.पक्के बांधकाम पहिला मजला सदनिका ५८० चौ.फुट | चंदा सिंग गोत्रा | स्मिता विजय घरत<br>विजय हरिश्चंद्र घरत |

**श्री.निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

# माथेरानकरांवर निकृष्ट दर्जाचे विघ्न

## नव्याने बसवलेले क्ले पेव्हर ब्लॉकवर खड्डे; प्रशासनाचे जाणीवपुर्वक दुर्लक्ष

| माथेरान | प्रतिनिधी |

**गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपलेला असून माथेरानमधील काही मुख्य रस्ते खड्डेमय झाले आहेत. काही ठिकाणी नव्याने क्ले पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले आहेत. परंतु, त्याचे देखील निकृष्ट दर्जाचे काम झाले असून ठिक ठिकाणी खड्डे पडले आहेत. प्रशासनाने त्यांची साधी डागडुजी सुद्धा केलेली नसल्याने याच खड्डेमय रस्त्यातून माथेरानकरांना गणपती बाप्पाला धक्के झेलत प्रवास करावा लागणार आहे. त्यामुळे माथेरानमधील गणेशभक्तांमध्ये तीव्र नाराजीचे सूर उमटताना दिसत आहेत.**



माथेरान येथील दस्तुरी नाक्यापासून ते लायब्ररीपर्यंत सद्यस्थितीत क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते बनविण्यात आले आहेत. परंतु, त्या रस्त्यांची कामे अत्यंत घाईगडबडीत पूर्ण केल्यामुळे बहुतांश भागात निकृष्ट दर्जाचे काम झाले आहे. परिणामी पावसाळ्यात बहुतांश ठिकाणी पाणी साचून खड्डे पडले आहेत. याच मार्गावरून सकाळी सहा वाजल्यापासून ते रात्री दहा वाजेपर्यंत ई-रिक्षांसह, घोडे, हातरीक्षा व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात रहदारी सुरू असते. इंदिरा गांधी नगर या भागातील पशुवैद्यकीय दवाखान्यासमोर तर जागोजागी खड्डे पडले आहेत. त्यातून मार्ग काढताना खूपच त्रासदायक बनलेले असून प्रवाशांना धक्के खात प्रवास करावा लागत आहे. विशेष म्हणजे माथेरानमधील अधिकारी वर्ग याच मार्गावरून प्रवास करत असतात, तरीदेखील या खड्ड्यांकडे त्यांचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे माथेरानकरांकडून आरोप केले जात आहेत. त्यामुळे यंदा बप्पाचे आगमन खड्डेमय रस्त्यातून होणार असून स्थानिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच, थंड हवेचे ठिकाण म्हणून नावारूपाला आलेल्या माथेरानमध्ये उत्तम दर्जाचे रस्ते नाहीत, ही विदारक दृश्ये माथेरानच्या प्रतिमेला धोका निर्माण करणार असल्याचे देखील जागरूक नागरिकांमधून बोलले जात आहे.

दरम्यान, माथेरान नगरपरिषदेच्यावतीने सेंट्रल हॉटेल ते टपालपेटी नाका या मुख्य मार्गावरील खड्डे बुजविण्यात आले होते. परंतु, टपालपेटी नाका ते पशुवैद्यकीय दवाखाना या मार्गावर असलेल्या खड्ड्यांमुळे हातरीक्षा चालक, अश्वचालक, ई-रिक्षा चालक तसेच पर्यटक व स्थानिक नागरिकांना कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. त्यातच चार दिवसांवर आलेल्या गणेशोत्सवाच्या कालावधीत ई-रिक्षातून श्रीगणेश मूर्ती आणण्यास गणेशभक्तांना खूप त्रास सहन करावा लागणार आहे. ई-रिक्षातून गणेश मूर्ती आणताना खड्ड्यांच्या खटक्यामुळे मूर्तिचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्याचा नगरपरिषदेच्या संबंधित विभागाने विचार करून लवकरात लवकर या मार्गावरील खड्डे बुजविण्याचे आदेश द्यावेत, जेणेकरून गणेशभक्तांसह पर्यटक व स्थानिक नागरिकांना या मार्गावरून प्रवास करताना व गणेशमूर्ती आणताना अत्यंत सोयीचे होईल, अशी मागणी माथेरानचे माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव यांनी केली आहे.

# निवडक

## नागपूरचे महादेव तुरणकर बेपत्ता

**अलिबाग :** नागपूर शहरातील हुडकेश्वर येथील महादेव नागुजी तुरणकर (६५) हे जुलै महिन्यात बेसा पिपळा रोड येथील आपल्या राहत्या घरातून हरवले आहेत. त्यांच्या हरलविल्याची तक्रार हुडकेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात



आली आहे. त्यांना ब्रेन ट्युमरचा आजार असून त्यांना विसरण्याची सवय आहे. दरम्यान, महादेव तुरणकर हरविल्याची माहिती सोशल मिडीयावर पसरल्यावर कुटुंबियांना ११ ऑगस्ट रोजी ते मुंबईतील गोरेगाव ते बोरीवली दरम्यान लोकलने प्रवास केल्याची माहिती मिळाली. त्यानंतर १३ ऑगस्ट रोजी रात्रीच्या सुमारास ते पनेवल एसटी स्टँड जवळ दिसल्याची माहिती मिळाली होती. महादेव तुरणकर यांनी अंगात फिकट निळा रंगाचा शर्ट, काळ्या रंगाची पॅन्ट घातली असून त्यांच्याजवळ काळ्या रंगाची छत्री आहे. या व्यात्की बाबत कोणाला माहिती मिळाल्यास हुडेश्वर पोलीस ठाणे (०७१२-२९५०१६७) रोहित तुरणकर (९०२२४३६३०६) व राहुल (८७८८१२६८४८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## ज्येष्ठ नागरिक संस्थेची सहल

**नागाव :** ज्येष्ठ नागरिक संस्था नागाव-आक्षी यांची धार्मिक सहल १३ ऑगस्ट रोजी श्रीवर्धन येथील दिवेआगर व हरी हरेश्वर येथे गेली होती. या सहलीत ५८ वर्षांपासून ते ८२ वर्षापर्यंतचे एकूण २४ ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते. सर्वांनी सहलीचा आनंद मनमुराद घेतला. या सहलीचे नियोजन संघाचे अध्यक्ष अनंत जोशी आणि सचिव दिलीप वाळंज यांनी केले होते. ही एक दिवसाची सहल आनंदात आणि उत्साहात साजरी करण्यात आली. या सहलीत सहभागी झालेल्या सर्व सभासदांची नाष्टा व जेवणाची सोय रमाकांत वर्तक व दिलीप वाळंज यांनी केली. शेवटी सहलीत सहभागी झालेल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचे आणि ज्यांनी या सहलीसाठी मदत केली त्या सर्वांचे सावंत यांनी आभार व्यक्त केले.

## तंटामुक्ती अध्यक्षपदी पांडुरंग सानप



**कोलाड :** संभे गावचे सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग सानप यांची महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. गुरुवारी (दि.२१) ग्रुप ग्रामपंचायत संभेच्या ग्रामसभेत त्यांची निवड करण्यात आली. यावेळी प्रशासक अधिकारी नरेश धुरे, ग्रामविकास अधिकारी रोहिणी गिजे, रोहा तालुका शेकाप चिटणीस शिवराम महाबळे, माजी सरपंच समीर महाबळे, राजेश सानप, राजेश्री सानप, नारायण बाकडे, हरि मोरे, अनंत सानप, लक्ष्मण बाकडे, पांडुरंग महाबळे, तुकाराम कडव, नामदेव किजबिले, तसेच संभे, पाले बु., पाले खुर्द येथील ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थित नागरिकांनी नवनिर्वाचित तंटामुक्ती अध्यक्ष पांडुरंग सानप यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पंचतारांकित पाहुणचाराने दिव्यांग भारावले



| रायगड | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील कुरूळ येथील आरसीएफ वसाहतीतील विशेष मुलांच्या शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांना गोंधळपाडा येथील हॉटेल ताजने खास निमंत्रित करुन त्यांचा आगळावेगळा पाहुणचार केला. या पाहुणचाराने सारेच सुखावले होते. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आत्मनिर्भर पालक असोसिएशन संचलित विशेष मुलांचे व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण केंद्राचा ध्वजवंदनाचा कार्यक्रम १५ ऑगस्ट रोजी अलिबागमधील कुरूळ येथील आरसीएफ कॉलनीत संपन्न झाला. यावेळी शाळेचे पदाधिकारी शिक्षक व विद्यार्थी हजर होते. या मुलांना समाजाच्या विविध गोष्टींमध्ये सामावून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याच्या हेतूने ताज अलिबाग रिसॉर्ट अँन्ड स्पा यांच्याकडून भेट देण्याचे आमंत्रण आले होते. त्यानुसार शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता देसाई यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक इतर सहाय्यक व पदाधिकारी यांनी प्रथमच पंचतारांकित हॉटेलला भेट देत तेथील पाहुणचाराचा आनंद लुटला.

# जुना मुंबई-पुणे महामार्गावर अपघात

| पनवेल | प्रतिनिधी |

जुना मुंबई-पुणे महामार्गावर बारवाईजवळ गुरूवारी (दि.२१) एक भयानक अपघात घडला. या अपघातात ४-५ वाहने एकमेकांवर आदळूनथेटरस्त्याच्याकडेलाफेकली गेली. मिळालेल्या माहितीनुसार, जुना मुंबई-पुणे महामार्गावरून जात असताना बारवाईजवळील एका कठीण वळणावर ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि समोरून जात असलेल्या गाड्यांना जोरदार ठोकर मारली. या धडकेत एक रिक्षा, मारुती इको, हुंदाई आणि स्कोडा कार यांचा समावेश आहे. या अपघातात सर्व वाहनांचे प्रचंड नुकसान झाले. या घटनेमुळे महाम ार्गावर काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

# बांधकाम विभागांचे खड्डे भरण्याचे आश्वासन



## साखळी उपोषण तात्पुरते स्थगित

| नेरळ-कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील रस्त्यांवरील खड्डे भरण्यात यावेत यासाठी पोलीस मित्र संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम यांनी १९ ऑगस्टपासून साखळी उपोषण सुरू केले होते. तालुक्यात कार्यरत असलेल्या बांधकाम खात्याच्या चारही विभागाच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील सर्व रस्ते खड्डेमुक्त करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. तालुक्यातील रस्ते खड्डेमुक्त झाले नाहीत तर बांधकाम खात्याच्या कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

पोलीस मित्र संघटना कर्जत तालुक्यातील सर्व रस्ते बांधकाम विभागाकडुन खड्डे मुक्त करण्यासाठी आवाज उठवत होती. त्यांनी गेल्या महिनाभर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावरील पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बसुन ठिय्या आंदोलन सुरु केले होते. तरी सुद्धा कर्जत तालुक्यात कार्यरत असलेले सर्व बांधकाम विभाग पोलीस मित्र संघटनेचे आंदोलन गंभीरपणे दखल घेत नव्हते. त्यामुळे रमेश कदम यांनी कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्ग असलेल्या छत्रपती संभाजी महाराज चौक येथे बेमुदत साखळी उपोषण सुरू केले. आगामी गणेशोत्सवाच्या आधी तालुक्यातील सर्व रस्ते खड्डेमुक्त व्हावेत, अशी त्यांच्यासह उपोषणकर्त्यांची मागणी होती.

साखळी उपोषणाची व्याप्ती लक्षात घेता सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग आली असून त्यांनी रस्त्यांवरील खड्डे भरण्याची लेखी हमी दिली आहे. ते आपल्या मालकीच्या रस्त्यावरील खड्डे हे जेएसबी टाकून भरणार आहेत. तसेच, राज्य रस्ते विकास महामंडळ, कर्जत नगरपरिषद बांधकाम विभागाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून जिल्हा परिषद बांधकाम विभागाने निधी उपलब्ध झाल्यानंतर मालकीच्या रस्त्यावरील खड्डे भरले जातील, असे आश्वासन दिले आहे. गणपतीपुर्वी जर बांधकाम विभागाने रस्त्यांची कामे केली नाही तर पुन्हा आंदोलन पुकारेल जाईल. या आंदोलनाला कर्जत शहर बचाव समिती व कर्जत वीज ग्राहक संघर्ष समितीचा जाहीर पाठिंबा असेल, असे ॲड. कैलास मोरे यांनी सांगितले आहे.

# कंत्राटदारांचे आंदोलन

| पाली | प्रतिनिधी |

राज्यातील विविध विकासकामांकरिता दिलेल्या कंत्राटांपैकी सुमारे ८९ हजार कोटी रुपयांची थकबाकी शासनाकडून अजूनही दिलेली नाही. याविरोधात महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व रायगड कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन यांच्यावतीने मंगळवारी (दि.१९) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. जिल्ह्यातील शेकडो ठेकेदारांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात एकत्र येत जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

# माथेरान परिषद निवडणुकीची रणधुमाळी लवकरच

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील गिरीस्थान नगरपरिषद असलेल्या माथेरान नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक आगामी काळात होण्याची शक्यता आहे. जानेवारी २०२३ पासून प्रशासकीय राजवट असलेल्या माथेरान पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, यावेळी माथेरानमध्ये १७ ऐवजी २० सदस्य निवडले जाणार असल्याने माथेरानकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.





माथेरान नगरपरिषद ब्रिटिश काळात स्थापन झाली असून गिरीस्थान नगरपरिषदेचा दर्जा असल्याने माथेरान पालिकेला राज्यस्तरावर महत्व आहे. माथेरान शहर कमी लोकवस्तीचे शहर असल्याने या ठिकाणी मतदार देखील कमी असतात. सध्या २०११ च्या जनगणनेनुसार ४,३९३ लोकसंख्या असून अनुसूचित जाती प्रवर्गाची लोकसंख्या ६२३ तर अनुसूचित जमाती प्रवर्गाची लोकसंख्या १८३ आहे. त्यामुळे या प्रवर्गातून अनुक्रमे तीन व एक सदस्य निवडला जाणार आहे.

नव्या रचनेत माथेरान पालिकेत १० प्रभागामध्ये प्रत्येकी दोन असे २० सदस्य निवडले जाणार असून त्यात ६ जागा या महिलांसाठी राखीव असणार आहेत. अनुसूचित जाती प्रवर्गातील २, अनुसूचित जमाती प्रवर्गातील १, नागरिकांचा मागास प्रवर्ग मधून ३ आणि सर्वसाधारण ४ महिला यांच्यासाठी आरक्षण आहे. तर, सर्वसाधारण गटात ७ जागा या खुल्या असणार आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्गातील ३ महिला आरक्षित जागा वगळता अन्य २ जागा खुल्या असणार आहेत. तर, थेट जनतेतून निवडून देणार असलेले नगराध्यक्ष पदाचे आरक्षण अद्याप जाहीर झालेले नाही.

# कर्जतची खुशी हजारे पुन्हा चर्चेत



| नेरळ | प्रतिनिधी |

बॉबी देओलचे बिग बजेट चित्रपटात कर्जत मधील भिसेगावातील बालकलाकार खुशी हजारे महत्वाच्या भूमिकेत दिसून येत आहे. 'वेड' या चित्रपटाच्या माध्यमातून आघाडीची बाल कलाकार म्हणून समोर आलेली खुशी आता 'वॉर २' मुळे पुन्हा चर्चेत आली आहे.

देशभरातील चित्रपट गृहात 'वॉर २' हा बिग बजेट चित्रपट नवनवीन विक्रम करीत आहे. या चित्रपटात बॉबी देओल सोबत बाल कलाकार खुशी हिच्या अभिनयाचे कौतुक होत आहे. 'वेड' या मराठी आणि हिंदीमध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटात बालकलाकार म्हणून पुढे आलेली खुशी हजारे हिने आपल्या अभिनयाने सर्वांना मंत्रमुग्ध केले होते. त्यावेळी अभिनेता रितेश देशमुख याच्या तोडीचा अभिनय खुशीने केला होता आणि त्याबरोबर तिला अनेक पुरस्कारही मिळाले आहेत.त्यात आता तिचा 'वॉर २' मधील अभिनय चित्रपट रसिकांची वहावा मिळवत आहे. हा चित्रपट संपल्यावर ही पोस्ट क्रेडिट सीन दाखवले जातात. त्यातील एका सीनमध्ये खुशी हिच्या हातावर बॉबी देओल टॅटू काढत असल्याचे पाहून तिचा अभिनय किती उजवा झाला याची चर्चा होत आहे.

**भक्तांचा पर्यावरणपुरक गणेशोत्सवाकडे कल | गणेश मूर्तिकारांची दमझाक**

# शाडूच्या मूर्तींना मागणी वाढली

| पनवेल | प्रतिनिधी |

गणेशात्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. गणेशाच्या मूर्तिवर शेवटचा हात फिरवण्यात मूर्तिकार व्यस्त आहेत. त्यातच शाडूच्या मूर्तिंना अचानक मागणी वाढल्याने मुंबई-गोवा महामार्गावर असलेल्या युसूफ मेहेरअली सेंटरमधील कारखान्यातील मूर्तिकारांची दमछाक होत आहे. तसेच, पावसामुळे मूर्ती सुकवण्यासाठी देखील मोठी कसरत करावी लागत आहे.

> **युसूफ मेहेर अली सेंटरमध्ये तयार होणाऱ्या मूर्तिंना परदेशात देखील मागणी आहे. मात्र, पॅकिंग करताना येणाऱ्या अडचणींमुळे सध्या परदेशात मूर्ती पाठवण्यात उडचणी निर्माण होत आहेत.**
> **– प्रकाश तांबे, मूर्तिकार**

ग्रामीण भागाच्या सशक्तिकरणासाठी स्थापित युसूफ मेहरअली सेंटरच्या कर्नाळा अभयारण्य परिसरातील कारखान्यात २०१९ पासून शाडूमातीपासून गणेशाच्या आकर्षक मूर्ती तयार करण्याचे काम करण्यात येत आहे. सुरवातीला २० मुर्त्यांपासूनची सुरूवात आता ३०० मुर्त्यांवर पोहचली आहे. शासनाकडून पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये पर्यावरण प्रति जागृती झाली आहे. त्यामुळे शाडूच्या मूर्तिच्या मागणीत दिवसेंदिवस वाढ होत असल्याची माहिती मूर्तिकार राजेंद्र



ठाकूर यांनी दिली आहे. ठाकूर आणि त्यांचे तीन सहकारी एप्रिल महिन्यापासूनच कारखान्यात मूर्ती घडवण्याचे काम अविरतपणे करत आहेत. युसूफ मेहेर अली सेंटरमध्ये सध्या ८ इंचापासून दोन फूट उंची पर्यंतच्या मूर्ती घडवण्यात आल्या आहेत. ८०० रुपयांपासून साडेचार हजारांपर्यंत किमतीच्या मूर्तिंची विक्री कारखान्यात करण्यात येत आहे.

### मातीची किंमत वाढली

**शाडूच्या मातीची किंमत यंदा वाढली आहे. मागील वर्षी २१० रुपयाला २५ किलो मिळणारी मातीची गोण यंदा २५० रुपयाला मिळत आहे.**

### मागणीनुसार रंगकाम

**शाडूच्या मूर्ती सहास आकर्षक रंगात रंगवल्या जात नाहीत. मात्र काही गणेश भक्त करत असलेल्या मागणी मुळे जादा दर आकारून गणेश भक्तांची मागणी पूर्ण करण्यात येत आहे.**

कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२५



जिंका रोज आकर्षक बक्षिस

प्रवेश मूल्य २०० रु. (फोटो काढण्याचे मूल्य वेगळे आकारले जाईल.)

: प्रायोजक :
नागरी सहकारी पतसंस्था (मर्यादित) अलिबाग
आरडीसीसी बँक सहप्रवास प्रगतीचा ISO 9001 - 2015 BANK

आपल्या गणपतीच्या सजावटीसह फोटो पाठवा व बक्षिसे जिंका.

स्पर्धेचे स्वरूप
■ आपण आमच्याकडे पाठविलेल्या गणपतीच्या फोटोला 'कृषीवल'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.
■ स्पर्धा २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत घेतली जाईल.

फोटोसाठी स्थानिक संपर्क

सुरेश खडपे (चौल) : ९९२१०५४६०६
जीवन पाटील(भाकरवड) : ७०६६८९८६३७/८१४९६६३८१३
संजय गायकवाड (कर्जत) : ९४२३३७७९००
समीर मालोदे (अलिबाग) : ९४२३३७५३६१
मुकुंद रांजणे (माथेरान) : ७५०७६७३८७९
अनिल गवळे (वेणगाव) : ९६८९९५४४२४
नंदकुमार मरोदे (खांब) : ८३०८६८८२२९
सलीम शेख (माणगाव) : ९४२३३८२७८९
सुधीर नाझरे (मुरुड): ९४२३३७७२४२
समीर रिसबुड (श्रीवर्धन): ९८८१९२२८३५
दत्ता म्हात्रे : (चिरनेर) : ७२०८३७७१०५
जुनेद तांबोळी (महाड) : ८४११९२४४६२
शैलेश पालकर (पोलादपूर) :९२२६८४९१८५
कांता हाबळे (नेरळ) : ९२०९२३८७६९
राजू नेवासेकर (मुरुड) : ९९२१६२३८४८/८२३७१३८९७४
सुनील ठाकूर (उरण) : ८१०८९२१५६५
मुस्कान खान (पेण) : ८९२८९११३९१
राकेश खराडे (रसायनी) : ९६६५३१४११५
बी.एस. कुलकर्णी(मोहपाडा): ९८६०६०९६५४
भूषण सुतार (सुधागड) : ८१४९६६४०५८
सत्यप्रसाद आढाव (रोहा) : ८९८३४२०१६१
अब्दुल सोगावकर (सोगाव) : ९९६०४८११३३
गणेश चोढणेकर (मुरुड) : ९२६००१६३२३
वैशाली मलबारी (पेण) : ८९८३९३६४५५
अल्ताफ चोरडेकर (रोहा) : ८८०५२४९५६७
सिद्धी दाखिणकर (माणगाव) : ७४९९३११८१७

स्पर्धेसाठी फोटो तुम्ही कृषीवल कार्यालय, वेश्वी किंवा krushivalganesh@gmail.com या इमेलवर पाठवा
अधिक माहितीसाठी संपर्क : 8975816900/9175708906

फोटो पाठविण्याची वेळ स. १०.३० ते संध्या. ५.३० वा. पर्यंत.

# महाराज, मत खेलो रमी

केंद्र सरकारने गेमिंगच्या नावाने चालू असलेल्या विविध प्रकारच्या ऑनलाईन व आधुनिक मटक्यांवर बंदी घातली असून हा निर्णय स्वागतार्ह आहे. फक्त हा निर्णय थोडा आधी घेतला असता तर माणिकराव कोकाटे यांचे कृषीमंत्रिपद वाचले असते. मोबाईलवर खेळली जाणारी रमी व त्यावर लावले जाणारे पैसे हा या गेमिंगमधला बराच लोकप्रिय प्रकार आहे. कोकाटेमहाशय भर विधानभवनात कामकाज चालू असताना हीच ती रमी खेळत होते. त्यावरच मग बराच ओरडा झाला व त्यांना खाते गमवावे लागले. असो. या क्षेत्रातून मिळणाऱ्या करोडो रुपयांच्या करांच्या महसुलावर पाणी सोडून लोकांच्या कल्याणासाठी आपण हा निर्णय घेत आहोत असे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत सांगितले. ते खरेच आहे. या खेळांचे व्यसन लागून लोकांचे होणारे नुकसान वेगळेच. पण या खेळांमध्ये पैशांचे आमिष दाखवून फ्रॉड करणाऱ्यांचे प्रमाणही मोठे होते. एका अंदाजानुसार ४५ कोटी लोक या असल्या फ्रॉडवाल्यांची शिकार झाले असून त्यांचे वीस हजार कोटी रुपये या दरोडेखोरांनी लुटले आहेत. बरे आपण या मटक्याच्या व्यवहारात फसलो हे लोकांना ठाऊक असल्याने ते तक्रारीसाठीही पुढे येत नाहीत. आणि आले तरी बहुतेकदा असले व्यवहार करणाऱ्या साईट्स या नायजेरिया किंवा अशाच कोणत्या तरी देशांमधून चालवल्या जात असतात. त्यांचे आयपी अ‍ॅड्रेस बनावट असतात. त्यामुळे या भामट्यांचे फावते. आता या खेळांवर अधिकृतरीत्या बंदी आली असून कायदा मोडणाराला एक कोटी रुपये दंड व पाच वर्षांपर्यंतची शिक्षा असेल. हिंदी सिनेमातले हृतिक रोशन, अन्नू कपूर किंवा अन्य लोक असल्या या मटक्याची सर्रास जाहिरात करीत असत. अन्नू कपूरचा आओ महाराज जंगली रमी खेलने हा संवादही लोकप्रिय झाला होता. आता अशी जाहिरात करणाऱ्यालाही तुरुंगवास व जबर दंड होईल. त्यामुळे या प्रकाराला आळा बसेल अशी आशा आहे. मटका काय किंवा दारु काय, यांच्यावर बंदी घातली की बेकायदा धंदे वाढतात हा पूर्वापारचा अनुभव आहे. मटका किंग रतन खत्रीला अटक झाली तरीही मटक्याचे आकडे खुलेआम छापले जात असत. आजही जातात. मटक्याचे बेटिंग घेणाऱ्यांचे अड्डे मुंबईतल्या दादर, परळ, घाटकोपर, ठाणे अशा सगळ्या रेल्वे स्टेशनांच्या आसपास आहेत. ग्रामीण भागात एस स्टँडच्या आसपास अशी दुकाने व तिथली गर्दी बघण्यासारखी असते. हे अड्डे कोठे आहेत हे पोलिसांना ठाऊक असते. अधून मधून त्यांच्यावर कारवाई होते. पण ते संपवणे सरकारला शक्य झालेले नाही. दारुबाबतही सरकारने पूर्ण बंदी ते थोडी सूट अशा विविध प्रकारे प्रयोग करून झाले आहेत. बंदी घातल्यावर बेकायदा दारुविक्री लगेच सुरू होते असा अनुभव आहे.

### व्यसन रोखणे आवश्यकच

तरीही बंदी आवश्यक असते. कारण मटका खेळणाऱ्यांना आपण बेकायदा गोष्ट करीत आहोत अशी एक जरब राहते. कधीही कारवाई होऊ शकेल अशी धास्ती असल्याने गरीब लोक या भानगडीत पडताना दोन वेळा विचार करतात. याच्या जाहिरातीवर बंदी आणल्याने पंधरा सतरा वर्षांच्या कोवळ्या तरुणांना यात ओढण्याचा जो प्रकार होतो तो बंद होईल. आयपीएलच्या काळात तुमची स्वतःची टीम तयार करा अशा प्रकारचा खेळ सुरू करून वेगळ्या प्रकारचा मटका सुरू होता. एकीकडे क्रिकेट किंवा खेळांमधील बेटिंगला आपल्याकडे बंदी आहे. आजच्या सामन्यात सूर्यकुमार किती षटकार मारेल, अमुक संघ कितीपर्यत धावा करील, इथपासून ते अमुक षटकात किती धावा निघतील अशांवर पैसे लावण्याचे फंडे लोकांनी काढले होते. लोकांना यात गंमत वाटत असली तरी हा मटकाच होता व यात लोकांचे कोट्यवधी रुपये जात होते. ड्रीम इलेव्हन, नजारा, जंगली गेम्स, झुपी, गेमक्राफ्ट, विन्झो अशासारख्या नावांच्या कंपन्या हे खेळ चालवत होत्या.या कंपन्यांची इंग्रजी नावे, झकपक इंग्रजीत वा हिंदीतून होणारे व्यवहार आणि नटनट्या आणि क्रिकेटपटू करीत असलेल्या जाहिराती यामुळे सर्वांनाच हा आधुनिक व भारी प्रकार वाटत होता. शिवाय सहजगत्या मोबाईलवर खेळता येत असल्याने पैसे लावण्यासाठी घराबाहेर पडण्याचीही गरज नसे. यामुळेच अगदी शाळकरी मुलेही या खेळांची शिकार होत असल्याच्या तक्रारी होत्या. याच कारणास्तव तेलंगणात यावर यापूर्वीच बंदी घालण्यात आली आहे. अगदी अमेरिकेतही याच्या जाहिरातींवर कडक निर्बंध आहेत. इंग्लंडमध्ये प्रसिद्ध व्यक्तींना याची जाहिरात करता येत नाही. म्हणजे त्या देशांनाही या खेळाचा धोका जाणवलेला आहेच. आपल्या सरकारने यापूर्वी अशा प्रकारच्या सातशे गेमिंग एप्सवर बंदी घातली होती. छत्तीसगडमधील महादेव एपचे प्रकरण गाजते आहे. हाही एक मटकाच होता. त्यातून शेकडो कोटींची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. मात्र बंदी आली की एका क्षणात सर्व काही सुरळीत होईल असे समजण्याचे कारण नाही. विशेषतः सध्याच्या जागतिक इंटरनेटच्या काळात एका देशात बंदी आली तर दुसऱ्या देशातून बनावट सर्व्हरच्या माध्यमातून हा धंदा चालू ठेवण्याचे प्रकार घडत असतात. तेलंगणात बंदी येऊनही लोक अशा पर्यायी कंपन्यांकडच्या खेळांमध्ये पैसे घालवतच राहतात असे दिसून आले आहे. यावर केंद्र सरकार काय तोडगा काढणार हे पाहावे लागणार आहे.

### सरकार ठाम राहील?

ही बंदी घातली जाताच मुंबई-पुण्यातील उच्चभ्रू, स्वतःला अर्थतज्ज्ञ म्हणवणारे आणि प्रत्येक गोष्टीचा केवळ धंद्याच्या दृष्टीने विचार करणारे अशांनी गळा काढायला सुरुवात केली आहे. गेल्या चार वर्षात परदेशातील बऱ्याच कंपन्यांनी या तथाकथित व्यवसायात सुमारे आठ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून सुमारे दोन लाख लोक यामध्ये सध्या काम करीत आहेत आहेत अशी आकडेवारी त्यांनी दिली आहे. आता एका बंदीसरशी ही गुंतवणूक पाण्यात जाणार असून लाखो लोक बेकार होणार आहेत. सध्याच्या मंदीच्या काळात अर्थव्यवस्थेला हा धक्काच असेल ही गोष्ट खरी आहे. तरीही सरकारने पूर्ण विचार करूनच हा निर्णय घेतला असेल असे गृहित धरायला हवे. शिवाय तो सामान्य जनतेच्या व्यापक हिताचाही आहे. मात्र तो ज्या रीतीने घेतला गेला आहे त्यावर मात्र जरूर टीका करण्यासारखी आहे. सरकारला हा व्यवसाय अनैतिक वाटत होता तर मुळातच त्याला प्रोत्साहन मिळणार नाही हे पाहायला हवे होते. त्याउलट अशा गेमिंग व्यवसायात अधिकाधिक गुंतवणूक होत असल्याबद्दल हेच सरकार आजवर पाठ थोपटून घेत होते. या गेमिंगवर २८ टक्के जीएसटी लागू होता. त्यातून भरपूर उत्पन्न कसे मिळते याच्या कहाण्या सांगितल्या जात होत्या. शिवाय, हा कर तीस टक्क्यांवर नेण्याचा विचार आहे असे सांगून एका दृष्टीने भावी गुंतवणूक करायला हरकत नाही असाच संदेश दिला जात होता. असे सर्व चालू असताना कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक सरकारने या व्यवसायावर बंदी घातल्याने कालपर्यंत सरकारला रीतसर कर देणारे हे दुकानदार एका रात्रीत बेकायदा ठरणार आहेत. वर्षानुवर्षे पालिकेला कर देणाऱ्या फ्लॅटवाल्यांना अचानक त्यांची इमारतच बेकायदा असल्याचे सांगून ती पाडण्याची कारवाई होते तसाच हा प्रकार आहे. या खेळांचे व्यसन लागू शकते त्यामुळे तो खेळताना सावधान असा सिगारेटसारखाच वैधानिक इशारा या खेळांच्या प्रत्येक जाहिरातीत दिला जात असे. त्यामुळे आम्ही सर्व नीतीनियमांचे व कायद्याचे पालन करीत होतो असा दावा करून हे व्यावसायिक बहुदा आता कोर्टात जातील. तिथे सरकारला आपली बाजू भक्कमपणे लढवावी लागेल. सरकार अमेरिका किंवा चीनच्या दबावाखाली येणार नाही, कोण्या बड्या भांडवलदारांच्या आमिषाला बळी पडणार नाही व घेतलेल्या निर्णयावर ठाम राहील अशी आशा करूया.

विचार

# राष्ट्रीय अंतराळ दिवसाच्या निमित्ताने...

*'राष्ट्रीय अंतराळ दिवस' केवळ भूतकाळातील यश साजरे करण्यासाठी नसून भविष्यातील विज्ञानप्रेमी पिढीला प्रेरणा देण्यासाठी आहे. या दिवशी देशभरातील शाळा, महाविद्यालये, संशोधन संस्था आणि विज्ञान केंद्रांमध्ये विशेष कार्यक्रम, प्रात्यक्षिके, शिबिरे, व्याख्याने आणि स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणीव जागृत होते आणि त्यांना विज्ञान क्षेत्रात कारकिर्द करण्यासाठी प्रेरणा मिळते.*

**वैष्णवी कुलकर्णी**

भारतात दरवर्षी २३ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय अंतराळ दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस भारताच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रातील एक ऐतिहासिक टप्पा दर्शवतो. विशेषतः २०२३ मध्ये चांद्रयान-३ मोहिमेच्या माध्यमातून भारताने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी पाऊल ठेवून जागतिक इतिहासात आपले नाव अजरामर केले. या ऐतिहासिक यशाच्या सन्मानार्थ भारत सरकारने २३ ऑगस्ट हा दिवस 'राष्ट्रीय अंतराळ दिवस' म्हणून घोषित केला. आज २०२५ मध्ये हा दिवस संपूर्ण देशभर विविध उपक्रमांद्वारे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भारताचा अंतराळ प्रवास हा गेल्या काही वर्षांमध्ये झालेला एक अद्भूत आणि प्रेरणादायी प्रवास आहे. १९६० च्या दशकात अत्यंत मर्यादित साधनसामग्री आणि तंत्रज्ञानाच्या अभावात सुरू झालेला हा प्रवास, आज आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या नेतृत्वाखाली अनेक यशस्वी मोहिमांपर्यंत पोहोचला आहे. १९६३ मध्ये केरळमधील थुंबा येथे पहिल्या रॉकेटचे प्रक्षेपण केले गेले आणि ते रॉकेटचा काही भाग सायकल आणि बैलगाडीतून नेऊन करण्यात आले होते. हे दृश्य आजही भारतीय अंतराळ क्षेत्राच्या संघर्षमय सुरुवातीची आठवण करून देते.

१९७५ मध्ये भारताचा पहिला उपग्रह आर्यभट्ट रशियाच्या सहकार्याने अवकाशात पाठवण्यात आला. ही एक ऐतिहासिक घटना होती, कारण त्यानंतर भारताने मागे वळून पाहिले नाही. १९८० मध्ये इस्रोने एसएलव्ही-३ च्या माध्यमातून स्वदेशी रॉकेटद्वारे रोहिणी उपग्रह प्रक्षेपित केला. ही घटना भारताच्या अंतराळ स्वावलंबनाचा पाया होती. नंतरच्या काळात इन्सॅट आणि आयआरएस (इंडियन रिमोट सेन्सिंग) या उपग्रह मालिकांनी भारतातील संप्रेषण, हवामान अंदाज, संसाधन व्यवस्थापन, कृषी संशोधन आणि आपत्ती व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांमध्ये क्रांती घडवून आणली. २००८ मध्ये भारताने चंद्राच्या दिशेने आपली पहिली स्वतंत्र मोहीम चांद्रयान-१ यशस्वीरित्या पूर्ण केली. या मोहिमेद्वारे चंद्राच्या पृष्ठभागावर पाण्याचे अंश असल्याचे पहिले वैज्ञानिक पुरावे मिळाले. त्यानंतर २०१३ मध्ये भारताने मंगळ ग्रहाच्या दिशेने मंगळयान (मार्स ऑर्बिटर मिशन) ही आपली पहिली मोहीम पाठवली. याद्वारे भारत पहिल्याच प्रयत्नात मंगळाच्या कक्षेत यशस्वीरित्या पोहोचणारा पहिला देश ठरला. एवढेच नाही तर, ही मोहीम अतिशय कमी खर्चात यशस्वी करण्यात यश आल्यामुळे भारताच्या तांत्रिक क्षमतेचे जगभर कौतुक झाले. पुढे २०१९ मध्ये चांद्रयान-२ मोहीम काही तांत्रिक अडचणींमुळे अपूर्ण राहिली असली तरी त्यातील ऑर्बिटर आजही चंद्राच्या कक्षेत कार्यरत आहे. त्यानंतर दोन वर्षांपूर्वी म्हणजेच २०२३ मध्ये भारताने इतिहास रचला. चांद्रयान-३ च्या माध्यमातून भारताचा 'विक्रम लँडर' चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीपणे उतरला. हे जगभरातले अशा प्रकारचे केवळ तिसरे यशस्वी लँडिंग होते. यामुळे भारताचे अंतराळ संशोधनातील स्थान मजबूत झाले.

२०२५ मध्ये म्हणजेच चालू वर्षात अलिकडेच घडलेली एक विशेष घटना म्हणजे भारताच्या शुभांशु शुक्ला या अंतराळवीराने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाऊन विविध वैज्ञानिक प्रयोग केले. हे प्रयोग जैविक प्रक्रिया, अन्नप्रक्रिया, इलेक्ट्रॉनिक्स आणि सूक्ष्मगुरुत्वाकर्षणाशी संबंधित होते. नुकतेच त्यांचे भारतात आगमन झाले. यावेळी लोकांनी केलेला जल्लोश आपण पाहिला. त्यांच्या नातलगांप्रमाणेच प्रत्येक भारतीयाने त्यांच्या परतण्याचे स्वागत केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. अशा घडामोडी देशाची प्रगती अधोरेखित करुन नव्या पिढीला प्रेरणा देण्याचे, दिशा दाखवण्याचे काम करत असतात. म्हणूनच या घटनेने यंदाच्या राष्ट्रीय अंतराळ दिनाला वेगळे परिमाण दिले, असेही आपण म्हणू शकतो. आपल्या अंतराळवीराने अंतराळात केलेल्या सगळ्या प्रयोगांचा उद्देश भविष्यातील दीर्घकालीन अंतराळ मोहिमांसाठी आवश्यक ज्ञान मिळवणे हा होता. भारताने अशा प्रकारच्या प्रयोगांमध्ये सहभाग घेतल्यामुळे आता देश स्वतंत्र अंतराळ स्थानक स्थापनेच्या दिशेने



पावले टाकत आहे. ही सर्वात मोठी उपलब्धी म्हणावी लागेल. थोडक्यात, 'राष्ट्रीय अंतराळ दिवस' केवळ भूतकाळातील यश साजरे करण्यासाठी नसून भविष्यातील विज्ञानप्रेमी पिढीला प्रेरणा देण्यासाठी आहे. या दिवशी देशभरातील शाळा, महाविद्यालये, संशोधन संस्था आणि विज्ञान केंद्रांमध्ये विशेष कार्यक्रम, प्रात्यक्षिके, शिबिरे, व्याख्याने आणि स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणीव जागृत होते आणि त्यांना विज्ञान क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रेरणा मिळते.

अंतराळ संशोधनाचा उपयोग केवळ अंतराळ मोहिमांपुरता मर्यादित नसून आपल्या दैनंदिन जीवनातही मोठ्या प्रमाणात होतो, हेदेखील या निमित्ताने आपण समजून घ्यायला हवे. उदाहरणार्थ, हवामान अंदाजासाठी वापरण्यात येणारे उपग्रह, शेतीसाठी जमिनीचे नकाशांकन, पूर आणि चक्रीवादळांसारख्या आपत्तींची पूर्वतयारीसाठी दिली जाणारी माहिती, टेलीमेडिसिन तसेच टेलीएज्युकेशनच्या माध्यमातून ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये सेवा पोहोचवणे हे सगळे इस्रोच्या कार्यक्षमतेमुळे शक्य होत आहे. आज आपले जीवन अधिक सुरक्षित, माहितीपूर्ण आणि कार्यक्षम करण्यामध्ये इस्रोचा मोठा वाटा आहे. भारताच्या अंतराळ क्षेत्राची वाटचाल आता अधिक व्यापक दिशेने होत आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे 'गगनयान' हे भारताचे पहिले मानवी अंतराळ मिशन लवकरच प्रक्षेपित होणार आहे. या मोहिमेच्या माध्यमातून भारत अंतराळात मानव पाठवणाऱ्या मोजक्या देशांमध्ये सामील होईल. ही मोहीम पूर्णतः स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित आहे. याशिवाय खासगी स्टार्टअप कंपन्यांना अंतराळ संशोधनात सहभागी होण्यासाठी सरकारने काही संस्था स्थापन केल्या आहेत. यामुळे भारताची अंतराळ अर्थव्यवस्था बळकट होणार आहे. स्कायरूट एअरोस्पेस, अग्निकूल कॉसमॉस, पिक्सेल, बेलाट्रिक्स एअरोस्पेस यासारख्या कंपन्यांनी स्वदेशी रॉकेट्स, उपग्रह आणि नवतंत्रज्ञान विकसित करण्यास सुरुवात केली आहे. या घडामोडींमुळे इस्रोवर असलेला भार कमी झाला असून त्याला आता संशोधन आणि नविन मिशन याकडे लक्ष केंद्रित करता येत आहे.

काही संस्थांमार्फत खाजगी आणि सरकारी भागीदारी अधिक सशक्त होत आहे. यामुळे भारतात 'स्पेस इकॉनॉमी' म्हणजेच अंतराळ अर्थव्यवस्थेचा वेगाने विस्तार होत आहे. त्यामुळेच भविष्यात भारत हा केवळ अंतराळात मोहिमा राबवणारा देश न राहता जागतिक अंतराळ बाजारपेठेतील एक महत्त्वाचा खेळाडू बनेल, यात शंका नाही. भारताने आंतरराष्ट्रीय सहकार्याद्वारे अनेक उपक्रम राबवले आहेत. आपली इस्रो ही संस्था अमेरिका, रशिया, फ्रान्स, जपान यासारख्या देशांबरोबर शास्त्रीय सहकार्य करून विविध प्रकल्प यशस्वीपणे पुढे नेत आहे. यामुळे भारताला केवळ तांत्रिक फायदा झाला नाही तर जागतिक स्तरावर एक विश्वासार्ह भागीदार म्हणून देखील ओळख मिळाली आहे. हे सगळे लक्षात घेता राष्ट्रीय अंतराळ दिवस हा केवळ एक सण नव्हे, तर भारताच्या वैज्ञानिक प्रगतीचा आणि आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेल्या पावलांचा गौरव आहे, हे प्रत्येक नागरिकाने ओळखायला हवे. हा दिवस आपल्याला मोठे स्वप्न बघायला शिकवतो, सातत्याने प्रयत्न करायला प्रेरणा देतो आणि विज्ञान, संशोधन तसेच राष्ट्रसेवेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे सूचित करतो. भारताचे अंतराळ क्षेत्र हे भविष्यात अनेक संधींचे दार उघडणार आहे. हा फार मोठा प्रवास आहे आणि आजची पिढी या सगळ्याची साक्षीदार होत आहे. तेव्हा यातून प्रेरणा घेत अनेकांनी अभ्यास करावा आणि देशाच्या उज्ज्वल भविष्याला हातभार लावण्यासाठी सज्ज व्हावे हे उत्तम.

चर्चा आजची

# भारताला मिळणार दाक्षिणात्य उपराष्ट्रपती

**सुयोग आंग्रे**

गेल्या महिन्यात जगदीप धनखड यांच्या अचानक राजीनाम्यापासून रिक्त झालेल्या उपाध्यक्षपदासाठी मतदान होणार आहे. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांनीही त्यांच्या उमेदवारांचा निर्णय घेतला आहे. भाजपा नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने म्हणजेच एनडीएने महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधकृष्णन, विरोधी पक्षांचा आघाडी, भारत, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी.के. सुदर्शन रेड्डी यांनी पैज लावली आहे. ते आंध्राचे आहेत, तर तामिळनाडूचे सीपी राधाकृष्णन. हे स्पष्ट आहे की दक्षिण वि दक्षिणचा हा सामना बऱ्याच पॅरामीटर्सवर मनोरंजक असणार आहे. लढत दोन वेगवेगळ्या राजकीय पक्षांमध्ये असलीतरी उप्राष्ट्रपतीपद मात्र दक्षिणेला मिळणार आहे. हे आता कोण्याज्योतिषाने सांगण्याची गरज नाही. घटनात्मक व्यवस्था आणि आदर्श लोकशाही रचना अशी अपेक्षा करतात की उपराष्ट्रपती राजकीय आणि तटस्थ असायला हवा. अध्यक्ष, उपाध्यक्ष यासारख्या पदांची शपथही या अर्थाने भिन्न आहे. घटनेच्या निष्ठा यासारख्या इतर भागांसह 'घटनेचे रक्षण करणे' या मुद्द्यावरही जोर देण्यात आला आहे. उपराष्ट्रपतींकडे केवळ एक महत्त्वाचे घटनात्मक पदचं नाही तर राज्यसभेची जबाबदारीदेखील आहे. अशा परिस्थितीत, सत्ताधारी पक्षासाठी या पदाचे महत्त्व राजकीय कारणास्तव आणि कायदेशीर अजेंडाच्या बाबतीत आणखी वाढते. सध्याचा परिदृश्य पाहता या निवडणुकीचे महत्त्वही वाढले आहे. जेव्हा जगदीप धनखड यांनी राजीनामा दिला, तेव्हा तेच कारण दिले गेले की ते आरोग्याच्या आधारे आपले पद सोडत आहेत, परंतु त्यानंतर घडलेल्या घडामोडींनी हे सिद्ध केले की त्याच्या अचानक निरोपामागील आणखी काही कारणे आहेत. सार्वजनिक जीवनात धंकरच्या सक्रियतेस मर्यादित ठेवूनही, शंका बळकट झाल्या की ते इतके सरळ नव्हते की असे म्हटले गेले होते. अनेक विरोधी राजकीय पक्षांनीही धनखारच्या सार्वजनिक जीवनापासून अचानक अंतरावर प्रश्न उपस्थित केले. आता हे नाकारणे कठीण आहे की सत्ताधारी पक्षाबद्दल अस्वस्थ राजकीय समीकरण धंकरच्या राजीनाम्याचे कारण बनले. एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांच्या स्वागताच्या वेळी पंतप्रधान मोदी यांनी 'ते राजकीय खेळ करणार नाहीत' असे वक्तव्ये, धनखर आणि सरकार यांच्यातील अंतर इतके विस्तृत झाले आहे की ते पुन्हा कधीही भरू शकले नाहीत. जर आपण दोन्ही शिबिरांच्या उमेदवारांकडे पाहिले तर प्रत्येक बाजूने बरीच पावले उचलली आहेत. भाजपच्या मूळ विचारसरणीशी धनखड यांचा फारसा संबंध नव्हता आणि तो इतर पक्षांच्या माध्यमातून भाजपाकडे आला आणि पक्षाने त्याला त्याच्या परंपरेच्या पलिकडे एक सर्वोच्च घटनात्मक पद बनविले.

त्याच्याबरोबरच्या अनुभवाचा धडा घेत भाजपने आपल्या खंता कामगार सीपी राधकृष्णनला नामांकित केले आहे. त्यालाही लांब राजकीय अनुभव आहे. ते तामिळनाडूचे पक्षाचे खासदार आहेत, जे भाजपासाठी तुलनेने अनुर्वर राजकीय भूमी आहेत. राज्याचे अध्यक्ष म्हणून त्यांची सक्रियता खूप लोकप्रिय होती. केरळसारख्या राज्यात त्यांनी निवडणुकीचा आरोपही ताब्यात घेतला. झारखंड आणि त्यानंतर महाराष्ट्रातील ते पहिले राज्यपाल होते. त्यांच्याद्वारे, भाजप अनेक लक्ष्यांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. पुढच्या वर्षी तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. हा राजकीय संदेश देण्यासाठी पक्षाची सेवा करेल. राज्यातील सत्ताधारी डीएमके केंद्र सरकारबद्दल खूप आक्रमक आहे. राज्य सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरण, एनईईटी परीक्षा, हिंदी भाषा आणि आर्थिक संसाधने आणि संभाव्य लोकसभेच्या व्याप्तीच्या मुद्द्यावर केंद्र व भाजपाभोवती जाण्याची संधी सोडली नाही. मर्यादा घालण्याच्या मुद्द्यावर, त्याने दक्षिणेकडील इतर राज्ये एकत्रित करण्याचा प्रयत्न केला. अशा परिस्थितीत राधाकृष्णनला उपाध्यक्ष बनवून भाजपा अशा हल्ल्यांच्या काठावर बोचून टाकण्याचा प्रयत्न करेल. विरोधी शिबिराने दक्षिण भारतातील उमेदवारही बनविले आणि भाजपच्या या धोरणाला सामोरे जावे लागले. याद्वारे त्याने डबल ऑर तयार केले आहे. एक म्हणजे सामना दक्षिण विरुद्ध दक्षिणेस बनविणे आणि तामिळ विरुद्ध तेलगू अस्मिता मार्गे एनडीएचा सर्वात मोठा सहयोगी तेलगू देसम पार्टीच्या समर्थनार्थ दंतकथा बनवण्याचा प्रयत्न करणे. हे जगनमोहन रेड्डी यांच्या पक्षासाठी कोंडी देखील निर्माण करू शकते, जे बहुतेकदा राज्यसभेच्या एनडीएला पाठिंबा देते. जरी चंद्रबाबू नायडू आणि रेड्डी यांना विरोधी शिबिराच्या पाठिंब्याचे कोणतेही आश्वासन मिळालेले नाही, परंतु तेलंगणाचे मुख्यमंत्री रिवंत रेड्डी यांच्या निवेदनात स्पष्टपणे दिसून येते की विरोधी पक्ष तेलगू अस्मितेचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न करतील. तथापि, तेलुगु अस्मिताच्या नावाखाली नायडू आणि रेड्डीसमोर धार्मिक तयार करण्याचा प्रयत्न केला गेला तर डीएमके आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टालिन यांचे प्रमुख देखील तामिळ उमेदवाराला जोरदार विरोध करतात. या निवडणुकीच्या माध्यमातून, गेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर उद्भवलेल्या सरकारच्या कमकुवत शिराला दडपण्यात विरोधक गुंतले आहेत. ही कमकुवतपणा संसदेत भाजपचा कमी केलेला आधार आहे. असे असूनही, राधाकृष्णन उपाध्यक्ष होण्याच्या मार्गावर कोणतेही विशेष काटे नाहीत. सरकारला त्यांच्या निवडणुकीबद्दल विश्वास आहे आणि आकडेही पूर्णपणे त्याच्या बाजूने आहेत.

लोकसंसद

## पावसाने परिक्षा घेतली, प्रशासन किती सक्षम आहे?

मुंबई आणि आजूबाजूच्या शहरात सलग चौथ्या दिवशी पडलेल्या पावसाने मुंबईची दैना करुन टाकली. मुंबईची गती रोखून दाखवली. मुंबई महापालिकेत मागील तीन वर्षे लोकप्रतिनिधी नाहीत. प्रशासकीय राजवट आहे. नगरसेवकांना नागरिकांची काळजी असते म्हणून ते सातत्याने नागरी सेवा, सुविधांबाबत प्रशासनाचे लक्ष वेधून घेतात. २६ जुलै २००५ एकाच दिवशी मुंबईत ९४२ मिलीमीटर पाऊस पडला होता. तेव्हा प्रशासन अन्यभिज्ञ होते समजू शकतो. त्यानंतर केंद्र सरकारने नैसर्गिक आपत्ती पासून बचाव करण्व्ययासाठी आपत्कालीन व्यवस्थापन सुरू केले. सर्व राज्यांना आपत्कालीन व्यवस्थापन सुरू करण्याचे आदेश दिले. मुंबईतील तीनही नद्या दहिसर, पोयसर आणि मिठी नदी वर्षानुवर्ष गाळाने आणि अनधिकृत बांधकामाने भरलेल्या होत्या म्हणून पाणी तुंबले असा निष्कर्ष काढण्यात आला. पावसाळी पाण्याच्या गटारांचे आकारमान वाढवण्यात आले, मोठे नाले, मध्यम नाले, छोटे नाले यांचे रुंदीकरण करण्यात आले. मुंबईतील सखल भागात पाणी बाहेर फेकण्याचे मोठ्या क्षमतेचे (हॉर्सपॉवर) पंप बसवले, दरवर्षी राजकीय पक्षांचे नेते, महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त मोठ्या नाल्यातील गाळ किती घनमीटर काढला हे पाहणी दौरे पत्रकारांना सोबत घेऊन करतात.पाणी तुंबले नाही याची ग्वाही देतात. कंत्राटदारास नाले सफाईचे कंत्राट मिळाल्यावर तो पावसाकडे टक लावून असतो, पाऊस पडल्यावर नाल्यातील गाळ वाहून जाईल. एवढे सोपस्कार करूनही निसर्ग सत्य काय आहे हे दाखवून देतो. त्यात सामान्य नागरिक, प्रवाशी, नोकरदार भरडला जातो. २००५ च्या महाप्रलयाला २० वर्षे झाली. आम्ही अजूनही जबाबदारीने वागायला तयार नाही. घरातील टाकावू वस्तू सहज गटारात, कचऱ्यात फेकून देतो. शिस्त फक्त महाराष्ट्रातील भूमिपुत्रांनी पाळायची बाहेरून इतर राज्यातून आलेल्यांनी नियम धाब्यावर बसवून आपली मनमानी करायची मग असे प्रसंग उद्भवणार. मुंबई महानगरपालिकेचे २२७ नगरसेवक, पाच स्वीकृत नगरसेवक, सहाय्य आयुक्त, उपायुक्त आयुक्त, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, महापालिका आयुक्त, उप महापौर आणि महापौर एवढे जन एक कोटी चाळीस लाख नागरिकांचे रक्षक आहेत तरीही आपत्कालीन व्यवस्थापन ढेपाळली याला जबाबदार कोण? पावसाने रस्त्यावर पाणी साचल्याने रस्त्यावरील वाहतूक मंदावली तर रुळ पाण्याखाली गेले. छत्रपती शिवाजीमहाराज टर्मिनस ते ठाणे लोकल वाहतूक आठ तास ठप्प झाली.मिठी नदीचे पाणी आजुबाजूच्या वस्त्यांमध्ये शिरले. दादर टी टी, हिंदमाता, शीव, अँटॉप हिल, पायधुनी, काळबादेवी सखल भाग असल्याने दोन फुट पाणी तुंबले होते.

**– महादेव गोळवसकर, मुंबई**

दिनविशेष

# नामवंत शास्त्रीय गायक विनायकराव पटवर्धन

पंडित विनायक नारायण पटवर्धन हे हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील ग्वाल्हेर घराण्याचे गायक होते. पटवर्धन यांचा जन्म १८९८ मध्ये महाराष्ट्रातील मिरज येथे एका सुसंपन्न दशग्रंथी ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे पालकांचे अगदी लहानपणीच निधन झाले. त्यामुळे त्यांचे काका केशवराव कोरटकर यांनी विनायकरावांच्या पालनपोषणाची जबाबदारी घेतली. पटवर्धनांचे हे काकाच त्यांचे संगीतातील पहिले गुरू. १९०७ सालापासून विनायकराव लाहोरच्या गांधर्व महाविद्यालयात संगीताचे पुढील शिक्षण घेऊ लागले. तिथे त्यांना विष्णू दिगंबर पलुस्कर गुरू म्हणून लाभले. विनायकरावांचा आवाज अस्खलित आणि लवचिक होता जो हाताळणी आणि सुधारणा करण्यात अगदी सहज होता. म्हणूनच ते अतिशय उच्च स्वरात आणि अतिशय वेगवान लयीत गाऊ शकत होते. त्यांनी १९१९ मध्ये गंधर्व महाविद्यालयातून संगीत प्रवीण मिळवले.



पटवर्धन गायनाबरोबर हार्मोनियम, तबला, जलतरंग, सतार आणि व्हायोलिन ही वाद्ये वाजवायलाही ते शिकले. त्यांनी कथक नृत्याचे प्राथमिक धडे घेतले होते. मिरजेला १९१९ साली परत आल्यानंतर त्यांनी ज्ञानाचार्य इचलकरंजीकर यांच्याकडे संगीतातील पुढचे प्रशिक्षण घ्यायला सुरुवात केली. या काळात त्यांनी आपले राग अजून पक्के केले. त्याचबरोबर त्यांनी ग्वाल्हेर घराण्याच्या सुमारे १५० बंदीशीही आत्मसात केल्या.

त्यांनी त्या काळातील बहुतेक सर्व महत्त्वाच्या संगीत महोत्सवांमधून आपली कला सादर केली. त्याबरोबरच गांधर्व महाविद्यालयाच्या मुंबई, नागपूर, लाहोरसह अनेक शाखांमध्ये शिकविण्याचे काम केले. मार्च १९२६ मध्ये त्यांची महात्मा गांधींशी ओळख करून देण्यात आली; त्यांनी साबरमतीच्या आश्रमात गांधीजींसमोर दोन गाणी गायली. ऑल इंडिया रेडिओने १५ ऑगस्ट १९२७ रोजी पटवर्धनांचा कार्यक्रम पहिल्यांदा प्रसारित केला.

त्यांनी मिरज येथे पंडित बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर व पुणे येथे रामकृष्णबुवा वझे यांच्याकडेही काही वर्षे संगीताचा अभ्यास केला. त्यांनी पुण्यात ८ मे १९३२ रोजी गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली. त्यांनी अनेक शिष्य तयार केले. त्यातील काही जण उत्कृष्ट गायक तर काही जण उत्तम शिक्षक बनले. १९४२ मध्ये त्यांनी भारतीय संगीत प्रसारक मंडळ या ट्रस्टची स्थापना केली. गांधर्व महाविद्यालयाचे कामकाज ट्रस्टकडे सोपविले.

ग्वाल्हेर शैलीच्या गायनाचे वैशिष्ट्य असलेल्या संगीत रागांना सहज सोप्या पद्धतीने गाण्याचा कल त्यांच्या गायनातून अधोरेखित होत असे. विनायकराव हे त्यांच्या तराण्यांसाठी प्रसिद्ध होते. त्यांची भजन गायनाची शैलीही निराळी होती. त्यांनी 'राग विज्ञान' (सात खंड), 'नाट्य संगीत प्रकाश' आणि 'महाराष्ट्र संगीत प्रकाश' ही पुस्तके लिहिली.

त्यांनी अनेक मराठी संगीत नाटकांमध्ये वेगवेगळ्या भूमिका केल्या. प्रख्यात कलाकार बालगंधर्व यांच्या जोडीने ते रंगमंचावर वावरले. त्यांच्या नेतृत्वाखालील भारतीय सांस्कृतिक प्रतिनिधी मंडळ सोव्हिएत संघ, पोलंड व चेकोस्लोव्हाकिया या राष्ट्रांचा दौरा करून आले होते. अशा या महान गायकाचे २३ ऑगस्ट १९७५ रोजी निधन झाले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मौजे दहिवली तर्फे नीड ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं. १२२.०० पैकी प्लॉट नं. १ ते २७ क्षेत्र १४२११ चौमी व प्लॉट नं. २८ क्षेत्र ८०६१ चौ मी यावर बांधलेल्या ललानी ड्रीम रेसिडेन्सी या प्रकल्पातील गार्डेनिया या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील ब्लॉक नं. १०२ क्षेत्र ५४२ चौ. फूट कारपेट रविंद्र आर शर्मा व इतर २ यांचे नावे असलेली मिळकत माझे अशिल १. मधुकर जयराम धुळे व २. प्रकाश मधुकर धुळे रा. मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१ या रजिस्टर्ड खरेदीखताने विकत घ्यावयाचे ठरविलेले आहे. सबब ज्या कोणा इसमास वा अन्य कोणत्याही नातेवाईकाची, सदरहू मिळकतीशी कोणत्याही प्रकारे कायदेशीर हक्क हितसंबंध, दान, करार, लीज, बयानापावती, खरेदीखत, गहाण, फरोक्त वगैरे असल्यास, त्यांनी खालील पत्त्यावर लेखी कागदपत्रासहीत हरकत, ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसात नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असल्याचे समजून, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा दस्त हा नोंदणीकृत करतील व त्यानंतर आलेल्या हरकतीचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | ब्लॉक नं. | क्षेत्र (चौ. फूट कारपेट) |
|---|---|---|
| मौजे दहिवली तर्फे नीड ता. कर्जत, जि. रायगड | १०२ | ५४२ चौ. फूट कारपेट |

सही/-
**ॲड. सोनाली सौरभ लाड**

पत्ता : राधाई निवास पाटील आळी दहिवली,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.नं. ७५१७६०७६५५
ईमेल :- sonalinakate35@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे खांडपोली, ता.- सुधागड, जि. रायगड**

| मिळकत मालकाचे नाव | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १) मिलिंद शिवाजी देशमुख | ३२१ | १-०५-० | ०.१२ |
| रा. तिवरे, ता. सुधागड, | ३२३ | ०-४१-५० | १.५६ |
| जि. रायगड | ३३३ | ०-८१-० | ०.२४ |
| २) शिवाजी दत्तात्रेय देशमुख | ३१६ | १-३२-० | २.५६ |
| रा. तिवरे, ता. सुधागड, | | पैकी ०-४०-० | |
| जि. रायगड | ३३४ | ०-९८-८० | ९.०२ |
| | | पैकी ०-४०-० | |

वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतींच्या मालक यांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतींचे मालक आमचे अशिलांचे लाभांत वरील मिळकतीचे खरेदीखत करून देणार आहेत. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकती निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २३/०८/२०२५

**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५

## अपर तहसिलदार व शेती न्यायाधिकरण अलिबाग यांचे न्यायालयात

**कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याचे कलम ३२ ग अन्वये**
**पोट-कलम (१) या अन्वये द्यावयाची**
**नोटीस** दावा क्रमांक २०/२०२४

१. नरेश शंकर पारंगे वगैरे सात — वादी/अर्जदार

**विरुद्ध**

१. शशिकांत दत्तात्रय टिल्लू
२. अजित दत्तात्रय टिल्लू
३. प्रज्ञा परशुराम पाटील
४. सुनीता अनंत देशपांडे
सर्व रा.मु.महाजने, पो.मल्याण, ता.अलिबाग, जि. रायगड — प्रतिवादी/सामनेवाला

**विषय- मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन**
**नियम १९५६ चे कलम ३२ ग प्रमाणे**
**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | गट नंबर | जुना स.नं. | क्षेत्र हेक्टर आर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| मौजे महाजने ता.अलिबाग | ३६७ | ९९/१ | ०-०४-००<br>पो.ख. ०-३०-००<br>एकूण ०-३४-१० | १.६२ |

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, वादी यांनी उपरोक्त नमूद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम ३२ ग नुसार खरेदी किंमत ठरवून मिळणेकामी या न्यायालयात दि.१७/१२/२०२४ रोजी दावा/अर्ज दाखल केला आहे.

आता तुम्हास नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारिख २३/०९/२०२५ रोजी ११-०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमीन न्यायाधिकरणा पुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावीत आहे जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न राहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- २०/०८/२०२५

सही/-
**(विक्रम पाटील)**
**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण**
**अलिबाग- रायगड.**

## -: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळवण्यांत येते की, खाली नमुद केलेल्या शेतजमीन मिळकती ह्या खाली लिहीलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून, ती त्यांचे खुद्द ताबा, कबजा मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे: ताडगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथील:-**

| मालकाचे नांव | गट/भुमापन क्र. | एकूण क्षेत्र : हे.आर. | आकार रू. पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| खेमा राया पिंगळा, गोविंद राया पिंगळा, भिमी किसन वरतोड | २४/२/अ | २-४३-०० | १=०० | २-आदिवासी खातेदार/गवतपड |

वरील मिळकतींसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहीवाट, ताबा, कबजा, वहीवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉर्टगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्याने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

हे कळावे,
दि. २३/०८/२०२५

**ॲड.रूचिता संतोष भगत**
ॲडव्होकेट
पत्ता: मु.पो.जांभुळपाडा,
ता.सुधागड, जि.रायगड
मोबा.क्र.९८६०२४७७३९

## महावितरण — निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग रोहा कार्यालयाअंतर्गत असणारे उच्चदाब वाहिनीच्या प्रतिबंधात्मक दुरुस्ती व देखभालीच्या कामासाठी वर्ष २०२५–२६ च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नेमणुक करणेसाठी ई–निविदा क्रमांक टी–०५,२०२५–२६ एकूण ०१ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. २३.०८.२०२५ ते ०८.०९.२०२५ पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. ०८.०९.२०२५ ला रात्रौ ११.५५ वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत / शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**PRO NO - 228** — **कार्यकारी अभियंत्ता, रोहा विभाग**

## महावितरण — निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग रोहा कार्यालयाअंतर्गत असणारे लघुदाब वाहिनीच्या प्रतिबंधात्मक दुरुस्ती व देखभालीच्या कामासाठी वर्ष २०२५–२६च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नेमणुक करणेसाठी ई–निविदा क्रमांक टी–०६,२०२५–२६ एकूण ०१ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. २३.०८.२०२५ ते ०८.०९.२०२५ पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. ०८.०९.२०२५ ला रात्रौ ११.५५ वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत / शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**PRO NO - 228** — **कार्यकारी अभियंत्ता, रोहा विभाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक श्री.श्रीकांत गोपाळदास मंत्री व १, दोघेही रा.मुंबई यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-दिघेवाडी ता.सुधागड, जि.रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|
| २५ | १-४८-०० | ०.५० |
| ३५ | ३-४६-०० | ०.८७ |
| ४८ | ०-८५-०० | ०.२५ |

वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतींच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतींचे मालक आमचे अशिलांचे लाभांत वरील मिळकतीचे खरेदीखत करून देणार आहेत. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचाही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकती निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २३/०८/२०२५

**ॲड.समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास बल्लाळेश्वर नगर
पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५

## ग्रामपंचायत चिरनेर

**ता.उरण जि.रायगड**
**निविदा सुचना** दिनांक:-२२/०८/२०२५

ग्रामपंचायत चिरनेर खालील कामाकरिता निविदा मागवित असून त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडल्या आहेत.

| अ. नं | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म मिळविण्याची मुदत | निविदा स्विकारण्याची तारीख व वेळ | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत चिरनेर हद्दीतील प्राथमिक शाळा चिरनेर सिलिंगचे काम करणे. | १०००००/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| २ | ग्रामपंचायत चांदावली वाडी प्राथमिक शाळा पत्रा दुस्स्ती करणे. | ३५००००/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| ३ | ग्रामपंचायत चिरनेर हद्दीतील अशोक मोकल ते चिरनेर हायवे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ३२३३६५/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| ४ | ग्रामपंचायत चिरनेर हद्दीतील तिरंगा पतपेढी ते मुख्य रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ३२६२२८/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| ५ | ग्रामपंचायत चिरनेर हद्दीतील श्री. लक्ष्मण म्हात्रे ते मयुर म्हात्रे धाकटे भोम रस्ता करणे. | ९५८१३/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| ६ | ग्रामपंचायत चिरनेर हद्दीतील स्मशान भुमी ते चिरनेर खाडी नाले सफाई करणे. प्रतिक गोंधळी ते पुजा हॉटेल नाले साफसफाई करणे, संजु भगत ते प्रविण मोकल यांच्या घरापर्यंतचा नाले साफसफाई करणे. | ३२०३१५/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| ७ | ग्रामपंचायत चिरनेर हद्दीतील सुनिल नारंगीकर ते तुळशीदास कातकरी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २५८८२८/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| ८ | ग्रामपंचायत चिरनेर हद्दीतील रस्ते दुरुस्ती करणे. (मनोहर रेवसकर ते अमित मुंबईकर रस्ता तयार करणे. | ३९९९९९/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| ९ | ग्रामपंचायत चिरनेर हद्दीतील केळ्याच माळ येथे स्मशान भुमी बांधकाम करणे. | १७९३००/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| १० | ग्रामपंचायत चिरनेर हद्दीतील रांजणपाडा अंतर्गत गटार बांधकाम करणे. | ८०००००/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| ११ | ग्रामपंचायत चिरनेर हद्दीतील चंदन कडु ते चंद्रशेखर मोकल गटार तयार करणे. (आपत्कालीन खर्च) | ४०००००/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| १२ | ग्रामपंचायत चिरनेर हद्दीतील पोलीस चौकी ते राम मंदिर व मराठी शाळा गटार बांधकाम करणे. | ४२७४०९/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| १३ | ग्रामपंचायत चिरनेर हद्दीतील साई मंदिर ते संध्या मुंबईकर गटार तयार करणे. (आपत्कालीन खर्च) | ८२१०२१/- | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | दि. २५/०८/२०२५ ते दि.०१/०९/२०२५ पर्यंत दुपारी १२:०० वाजेपर्यंत | सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |

**शर्ती व अटी:-**

१.सदरचे ठेकेदार शासनाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
२.सदरचे काम केलेले अनुभवाचे दाखले जोडणे आवश्यक आहेत.
३.सदर कामाचे ॲडव्हान्स रक्कम देता येणार नाही. जसे काम होईल त्याप्रमाणे बिल अदा केले जाईल.
४. सदर काम तांत्रिक अधिकाऱ्यांच्या देखरेखीसाठी स्पेसिफिकेशन नुसार करणेचे आहे. तसेच सदर कामावर ग्रामपंचायत कमिटीची देखरेख राहील.
५. सदरचे कामापोटी ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम बिलांतून कापली जाईल.
६. सदरच्या कामाचे तांत्रिक अधिकाऱ्याच्या मुल्यांकनानुसार कामाचे बिल अदा केले जाईल.
७ .सदर कामाचे निविदा पत्रक अट नं. १ व २ या कागदपत्रांची पूर्तता केल्याखेरीज ठेकेदाराने स्वतः किंवा ठेकेदाराने नियुक्त केलेल्या प्रतिनिधीद्वारा निविदा देण्यात येईल.
८. अंतिम निविदा स्विकृतीनंतर योग्य त्या किंमतीचा दस्तऐवज ठेकेदाराने स्वतः खरेदी करुन ग्रामपंचायत यांचे सोबत करारनामा करावयाचा आहे.
९. सदर कामामध्ये साहित्याच्या किंमतीचे बाजार भावामध्ये वाढ झाल्यास रेती, खडी, स्टील व सिमेंट कोणत्याही वाढीव रक्कम देण्यास ग्रामपंचायतवर बंधनकारक राहणार नाही.
१०. सुरक्षा अनामत रक्कम सदर कामाचे अंतिम बिल झाल्यानंतर ६ महिन्याचे कालावधी नंतर आदा केले जाईल.
११. कोणतेही कारण न देता एक अगर सर्व निविदा नामंजुर करण्याचा अधिकार खालील सह्या करणाऱ्याने (सरपंच यांनी) राखुन ठेवला आहे.
१२. ठेकेदाराने काम सुरू करण्यापुर्वी काम चालु व काम पुर्ण झाल्यानंतर असे कामाचे फोटो सादर करणे तसेच कामाच्या ठिकाणी कामाचा बोर्ड लावणे आवश्यक आहे.
१३. कामाची रक्कम ऑनलाईन पद्धतीने करणेत येईल.
१४. सर्व कागदपत्र सक्षम अधिकाऱ्याकडुन साक्षांकित करुन सादर करण्यात यावीत.

ग्रामपंचायतः- चिरनेर
दिनांकः- २२/०८/२०२५

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## MAHATRANSCO — SRM E –TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-20/2025-26 Dtd.23.08.2025 RFx No. 7000037415 | **Sub.:-** Invitation for SRM E-Tender for Supply of 5kV Digital Insulation Tester at 100/22kV Roha Substation under EHV (O&M) Division Mahad | Rs.5,04,278/- (Including GST) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST
**Bid submission is from 23.08.2025 @ 00:00 hrs to 06.09.2025 @23:59Hrs for above tender**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.8793505100
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

-Sd-
**Executive Engineer (I/c)**
**EHV(O&M) Dn. Mahad**

## ग्रुप ग्रामपंचायत देवन्हावे
## ता. खालापूर, जि. रायगड

जा.क्र. ३६२ — **ई-निविदा सूचना** — दिनांक : २१/०८/२०२५

ग्रुप ग्रामपंचायत देवन्हावे ता. खालापूर, जि. रायगड यांचे वतीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात शासनाचे नोंदणीकृत ठेकेदार व पुरवठादार कडून तथा अनुभवी व इच्छुक ठेकेदार व पुरवठादारांकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यात ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. सदरची निविदा प्रक्रिया online पद्धतीने संगणकीय प्रणालीवर होईल. सदरची निविदेसंदर्भात सूचना आवश्यक असणारे साहित्य कागदपत्रे अटी व शर्ती, ई-निविदा कालावधी, तरतूद इ. माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रुप ग्रामपंचायत देवन्हावे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निधी |
|---|---|---|---|
| १. | मौजे देवन्हावे येथील हनुमान मंदिरपासून ते नदी पर्यंत गटार तयार करणे. | ३१,३७,३६१/- | ग्रामनिधी |
| | ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. २२/०८/२०२५ ते दि. ०५/०९/२०२५ | |
| | ई-निविदा उघडणे | दि. ०६/०९/२०२५ | |

खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) https://wrd.maharashtra.gov.in
२) https://mahatenders.gov.in

आपले विश्वासू

**(प्रमोद नाना काळे)**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत देवकान्हे

**(रत्ना रोहिदास वाघमारे)**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत देवकान्हे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे म्हात्रोळी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक १) हेमंत जनार्दन नाईक, २) वंदना जनार्दन नाईक, ३) प्रविण जनार्दन नाईक, ४) रोहिदास विठोबा नाईक, ५) सुरेश चिंतामण नाईक, ६) जयश्री जनार्दन नाईक, ७) उदय जनार्दन नाईक, ८) किरण जनार्दन नाईक, ९) तृप्ती जनार्दन नाईक, १०) शुभदा जगन्नाथ नाईक, ११) मालती मधुकर नाईक, १२) अरुणा किसन राणे, १३) संतोष रमेश नाईक, १४) जितेंद्र रमेश नाईक, १५) अपेक्षा अनंत नाईक, १६) संजय मधुकर नाईक, १७) संदिप मधुकर नाईक, १८) दिपाली अजित साबळे, १९) वर्षा सतिश पाटील, २०) मालिनी गजानन पाटील, २१) आस्था अशोक म्हात्रे, २२) जयश्री नरेश नाईक, २३) आदित्य नरेश नाईक, २४) स्नेहा उदय तरकर, २५) वसुधा वसंत नाईक, २६) स्मिता विजय नाईक, २७) सुबोध वसंत नाईक, २८) संपदा समिर नाईक, २९) शिवांश समिर नाईक, ३०) रुपाली रमेश घरत, ३१) सुनिल सुंदर वार्डे, ३२) वृषाली विकास पाटील, ३३) संध्या अजय चोरघे, ३४) उमेश सुंदर वार्डे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी | २१७/१ | ०-४१-४० | २.०२ |
| म्हात्रोळी | २१७/२ | ०-२७-०० | १.७५ |
| | | पो.ख. ०-०५-२० | |
| | | ०-३२-२० | |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २३/०८/२०२५

सही/-
**ॲड.गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१

## पनवेल महानगरपालिका

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१०२०६.**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.:०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय:०२२-२७४५२३३९
ई-मेल: panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/वै.आ.वि/८९८/सन २०२५-२६ — दिनांक:-२२/०८/२०२५

**शुद्धीपत्रक**


निविदा क्रं.MHD/०३/२०२५-२६
(2025_PMC_1204722_1)

पनवेल महानगरपालिका नागरिकांच्या आरोग्य सेवेसाठी Portable Handend Digital X-ray Machine with AI Software of Tuberculosis Detection (Chest AI) चे ०४ युनिट खरेदी कामी ई-निविदा क्रं.MHD/०३/२०२५-२६ दिनांक २८.०७.२०२५ रोजी : http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. तथापि, प्रशासकीय कारणास्तव हि निविदा रद्द करण्यात येत आहे.

सही/-
**(प्रसेनजीत कारलेकर)**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**


**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# निवडक



## गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**कोर्लई :** दिघी पोर्ट लिमिटेड अंतर्गत अदानी फाऊंडेशनतर्फे अब्दुल सत्तार इस्माईल अंतुले हायस्कूल येथे दहावी व बारावीच्या परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. या सोहळ्यात तालुक्यातील १४ शाळा व कॉलेजमधील एकूण ७३ विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमास अनंत मेंदाडकर, गोपाळ मेंदाडकर, देविदास कावळे, जनार्दन गोवारी, जयदास अंबाजी, परशुराम बिराडी, उत्तम वाणी, वेदकुमार मुंढे, सिद्धेश अंजरलेकर, अवधूत पाटील तसेच विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीनिवास नागावकर यांनी केले तर कार्यक्रमासाठी नम्रता दिघीकर, प्राजक्ता अडुळकर, अरुंधती पिळणकर व अ. स. ई. अंतुले हायस्कूलच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## उन्मळलेल्या झाडाला जीवनदान



**माणगाव :** मोरबा रस्त्याच्याकडेला एक झाड उन्मळून निपचित पडले होते. नुकत्याच आलेल्या वादळवाऱ्यामुळे ते कोसळले. मात्र फांद्यांवरील हिरवळींनी अजूनही त्याच्या जगण्याची उमेद दाखवत होती. मॉर्निंग वॉक दरम्यान अरुण पवार आणि मित्र मारुती मालोरे, निशांत साठे व संदेश जाधव यांच्या मदतीने या झाडाला पुन्हा उभं करण्याचा निर्णय घेतला. त्या झाडाच्या एका बाजूच्या मुळाला आधार देऊन त्याला माती भरून मजबूत केले. बाजूच्या झाडांच्या वेलींनी घट्टसर बांधणी करून या झाडाला नवसंजीवनी दिली.

## गणपती उत्सवाचा अमृत महोत्सव

**अलिबाग :** स्व. चिंतामण कानू पाटील परिवारातील वामन द्वादशी गणेशोत्सवाचे हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. भाद्रपद शुध्द चतुर्थीला प्रतिष्ठापना करून वामन द्वादशी या दिवशी गणेशमुर्ती विसर्जन करण्याची परंपरा १९५१ पासून सुरु झाली आहे. या परंपरेला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. यावर्षी २७ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत कुरूळ येथे गणपती उत्सवाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि.२७) सकाळी साडेनऊ वाजता गणेशमुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. रविवारी (दि.३१) सकाळी आठ वाजता श्रीगणेश याग, सायंकाळी साडेचार ते सात वाजता चक्री भजन मैफिल रंगणार आहे. बुधवारी(दि.३) सप्टेंबरला अखंड भजन महोत्सवाचे आयोजन सकाळी दहा वाजता करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ संगीत भजन गायक हरिश्चंद्र बुवा लोणकर यांच्या हस्ते होणार आहे. गुरुवारी (दि.४) सकाळी साडेनऊ वाजता श्रीगणेश अभिषेक व धार्मिक विधी होणार आहे. त्यानंतर सायंकाळी पाच वाजता, विसर्जन मिरवणूक काढण्यात येणार आहे. मिरवणुकीसोबत श्री गणेशनाथ महाराज वारकरी दिंडी व शोभायात्रा असणार आहे.

## उरण पोलिसांचे नशामुक्तीचे आवाहन

**उरण :** उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी दहीहंडीच्या उत्साहात नशामुक्त उरण या अभिमानाच्या उपक्रमाची सुरुवात केली. ड्रग्स नको, शिक्षण हवे नशा नको, दिशा हवी अशा घोषणांनी व्यासपीठ दणाणून गेले. मिसाळ यांचे हे आवाहन ऐकून उपस्थित तरुणांनी टाळ्यांचा गजर केला. या नशेमुळे उरणच्या तरुणाईचे आयुष्य नशेच्या गर्तेत ओढले जात आहे. कारवाईची मागणी होत असूनही पोलिसांचे गूढ मौन प्रश्नांकित आहे. शासकीय यंत्रणा आणि नशीली पदार्थ विक्रेते यांचे आर्थिक नातं काय आहे? असा सवाल उरणच्या गल्लीबोळात घुमत आहे. मिसाळ यांचा उपक्रम कौतुकास्पद आहे. पण उरण खरंच नशामुक्त व्हायचं असेल तर बॅनरबाजी किंवा घोषणांनी ते शक्य नाही. नशेचा सप्लाय करणाऱ्या माफियांवर गंडांतर घालावे लागेल असे त्यांनी यावेळी सांगितले.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- बोलेरो पिकवर ड्रायव्हर पाहिजे. ९४२२१५१४५१
- शिवानी पेट शॉप अलिबाग/चोंढी/पेण/तळोजा येथे कामाकरिता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६.
- अलिबाग शहराच्या मध्यभागी २ बीएचके टेरेस फ्लॅट. एस.टी. स्टँड, कॅटामरन बस स्टॉप पासुन चालत ५ मिनटाचे अंतरावर सुसज्ज, २ एसी सह. इन्व्हर्टर फिटींग, ईलेक्ट्रिक गीझर, किचन ट्रॉली व बऱ्याच सुविधा. त्वरा करा, अत्यंत मोक्याचे ठिकाण व सोयीसुविधांनी सुसज्ज. संपर्क. ७८७५५६०८१/ ९४२३३७७६०८/७७४१००२३०८
- अलिबाग येथील ऑफिस कामाकरीता इंग्लिश व मराठी टायपिंग येणारी टायपिस्ट पाहिजे. मोबाईल नं. ९१४६६२४५१०. वेळ सकाळी १० ते ६
- मालाडे, अलिबाग-रोहा या रस्त्यालगत (१५ एकर) ६०० गुंठे शेत जमीन रुपये तीन लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १२४ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२
- श्रीगाव, अलिबाग येथे शेत जमीन २३० गुंठे, रुपये ४ लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक २७७ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२
- वरसोली, अलिबाग येथे शहरालगत १०० गुंठे शेत जमीन रुपये २० लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १७३ लगत)सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# यंदाही भक्तांचा प्रवास खड्ड्यातूनच

**▶▶ गणेशोत्सवासाठी चाकरमान्यांची निघण्याची तयारी ▶▶ तीन हजारहून अधिक वाहने धावण्याची शक्यता**

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

बाप्पाच्या स्वागतासाठी चाकरमानी कोकणासह रायगड जिल्ह्यात येण्याच्या तयारीला लागले आहेत. काही जण खासगी वाहनांने तर काही जण एसटी महामंडाच्या बसने प्रवास करणार आहेत. मात्र, मुंबई-गोवा महामार्गासह अलिबाग रोहा, साळाव, तळेखार, तसेच ग्रामीण रस्त्यावरील खड्डे कायमच आहेत. ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. मुसळधार पावसाने हे खड्डे अधिकच खोल झाले आहेत. त्यामुळे यंदाही गणेश भक्तांचा प्रवास खड्ड्यातून होणार असल्याचे दिसून येत आहे.

कोकणासह रायगड जिल्ह्यात गणेशोत्सव सण थाटामाटात साजरा केला जातो. यंदा जिल्ह्यामध्ये एक लाख दोन हजार ४८४ गणेश मुर्तींची प्रतिष्ठापना केल जाणार आहे. बाप्पाच्या स्वागतासाठी



चाकरमान्यांची रायगडसह कोकणात निघण्याची तयारी सुरु झाली आहे. काहीजण दोन दिवस तर काहीजण पाच दिवसांची सुट्टी काढून गणेशोत्सव साजरा करण्यासाठी रायगड व कोकणात येणार आहेत. मुंबई, ठाणे, बोरीवली, खार, विरार, वसई अशा अनेक ठिकाणी नोकरी, व्यवसायानिमित्त असणारे हजारो चाकरमानी येणार आहेत. बुधवारी (दि.२७) गणरायाचे आगमन होणार आहे. त्यामुळे रविवारपासून चाकरमानी गावी येण्याची शक्यता आहे. मुंबई गोवा महामार्ग क्रमांक ६६ व पाली फाटा ( खोपोली ) वाकण राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ या मार्गावर गणेशभक्तांच्या वाहनांची वर्दळ असणार आहे.

तीन हजारहून अधिक वाहने या मार्गावरून धावण्याची शक्यता आहे. परंतु, मुंबई गोवा महामार्गावरील चार पदरीकरणाचे काम गेल्या १४ वर्षापासून रखडले आहेत. अनेक राजकीय नेत्यांची आश्वासने, आंदोलने, पाहणी दौरे झाले तरीदेखील अद्यापही हे काम पूर्ण झालेले नाही. चार पदरीकरणाचे काम अपूर्ण स्थितीत आहे. अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने रस्ता शोधावा लागत आहे. नुकतेच राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांनी महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून एका वर्षात कामे पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

नागोठणे पासून अवेटीपर्यंतच्या रस्त्यासह मुंबई गोवा महामार्गावरील पनवेल ते पेण मार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. अलिबाग-रोहा मार्गावरील वेलवली खानाव ते उसर तसेच साळाव ते तळेखार रस्त्यावर खडड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. जिल्हा परिषद अंतर्गत येणारे ५० किलो मीटरचे रस्ते खराब झाले आहेत. या रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. आठवडयाभरापासून जिल्हयात मुसळधार पाऊस पडला. या पावसात खड्डे खोल झाले आहेत. गणेशोत्सवासाठी आपल्या गावी येणाऱ्या चाकरमान्यांचा त्रास यंदाही कायम असल्याचे चित्र आहे.

### चाकरमान्यांच्या नशीबी तेच खड्डे

**मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या निकृष्ट कामामुळे नव्याने केलेल्या काँक्रीट रस्ताही दरवर्षी पावसाळ्यात खड्ड्यात जात आहे. सरकारच्या या ढिसाळ कारभाराने चाकरमान्यांच्या नशिबी तोच रस्ता, तेच खड्डे, अशी भयंकर परिस्थिती निर्माण झाली आहे.**

## डोक्यावर टोपली घेऊन औषधाचा प्रसार

**| महाड | प्रतिनिधी |**

संपूर्ण सारे जग ऑनलाइन पद्धतीने जन्मापासून शिक्षणापर्यंत ते नोकरी उद्योगधंदे व शारीरिक औषध उपचाराच्या बाबतीत देखील जग एकीकडे शास्त्रीय पद्धतीने पुढे जात असताना देखील आजोबा-पंजोबाची पुण्याई पार पाडीत २२ वर्ष. सातारा जिल्ह्यातील पाटण पासून ते रायगड पासून ठाणे जिल्ह्यातील उपनगरापर्यंत ते आज देखील आयुर्वेदिक औषधाचा प्रसार करीत जनतेला आयुर्वेदाचे महत्त्व पटवून देण्याचे काम राजाराम झोरे हे करीत आहेत

सध्याच्या युगामध्ये शास्त्रीय पद्धतीने जन्माला आल्यापासून ते मृत्यूच्या दारात जाईपर्यंत सर्वत्र ऑनलाईन पद्धतीने व शास्त्रोक्त पद्धतीने सर्वच बाबतीत जनता



अग्रेसर असताना दुसरीकडे आजोबा-पंजोबाची पुण्याई जपण्यात व पोटाची खळगी भरण्यासाठी पारंपारिक आयुर्वेदाचा प्रसार तब्बल २२ वर्ष. एक अवलिया करीत असल्याचे त्यांच्या भेटीअंती पाहण्यास मिळाले. सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील पाणेरी गावातील राजाराम झोरे नावाचे गृहस्थ कोणतीही लाज न बाळगता डोक्यावर टोपली खाली घोंगडी घेऊन ते आपला दिनक्रम पूर्ण करीत आहेत

पाटण तालुक्यातील राजाराम झोरे हे. वात, पित्त, खोकला, दमा, गॅस, ऍसिडिटी, मधुमेह, मुतखडा, संधिवात, मणके दुखी, गुडघेदुखी या सर्व आजारांवर ते आयुर्वेदिक औषधे देत शासकीय कार्यालयापासून ओळखीच्या नागरिकांच्या घरी ते जात असतात

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील राजाराम झोरे पाटणपासून ठाण्या पासून कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, उरण या ठिकाणी ते आयुर्वेदिक औषध घेऊन डोक्यावर टोपली व डोक्याखाली घोंगडी अशा पारंपारिक विषयात ते फिरत असतात. ज्यांना आयुर्वेदिक औषधे दिली त्यांना याच्यापासून लाभ झाला असल्याचे राजाराम झोरे यांनी यावेळी सांगितले.

## 'खड्डे शोधा' स्पर्धा

**पाली/वाघोशी :** सुधागड तालुक्यातील जनतेला खड्ड्यांमुळे त्रास सहन करावा लागत असताना, शिवसेना शाखा परळी यांनी त्यावर तोडगा काढला आहे. शासनाच्या खड्डेमय रस्त्यांवरून वाहन चालवताना जीवावर उदार झालेल्या प्रवाशांना आता हसतं-खेळतं बक्षीस मिळणार आहे. कारण वाकण-पाली-खोपोली हायवे खड्डे शोधा आणि मिळवा बक्षीस ही भन्नाट स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्यांना फक्त खड्ड्याचा फोटो काढून आयोजकांकडे पाठवायचे पहिल्या क्रमांकाला तब्बल २२२२ रुपये, दुसऱ्या क्रमांकाला ११११ रुपये आणि तिसऱ्या क्रमांकाला ७७७ रुपये अशी बक्षिसं ठेवण्यात आली आहेत.दरम्यान, गावकऱ्यांमध्ये या फलकाची जोरदार चर्चा सुरू आहे.

## महाड शहरात खड्ड्यांचे साम्राज्य

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड शहर हे ऐतिहासिक नगरी असून या शहरातील मुख्य रस्त्याविषयी शहरातील अंतर्गत रस्त्यांवर देखील मोठ्या प्रमाणावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्ड्यात अशी अवस्था झाली असून रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांवर शेती करायची का असा सवाल करीत गणेशोत्सवापूर्वी शहरातील रस्त्यांची तातडीने डागबुजी करा असा इशारा महाड शहर मनसे अध्यक्ष पंकज उमासरे यांनी महाडच्या मुख्याधिकाऱ्यांना दिला आहे

महाड शहर हे ऐतिहासिक नगरी असून शहरातील मुख्य रस्त्यांचे अंतर्गत रस्त्यांचे पावसाळ्यापूर्वी सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यांवर डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र पावसाळा सुरू झाल्यापासून सर्वच रस्त्यांवर महाडमध्ये खड्डे पडले या खड्ड्यातून मार्ग काढताना वाहन चालकांसहित रिक्षा चालकांना देखील मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे मागील आठ दिवसांपूर्वी देखील महाड रिक्षा चालक-मालक संघटनेने महाड शहरातील पडलेल्या रस्त्यांवरील खड्डे तातडीने भरण्याची मागणी नगरपालिका प्रशासनाकडे करून देखील त्यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने शहरात मोठ्या प्रमाणावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहेत.

गणेशोत्सवाच्या आधी भरले नाहीत तर नागरिकांच्या हितासाठी महाडमध्ये आंदोलन घेण्याचा इशारा देत या आंदोलनाला जबाबदार महाड नगर परिषदेचे मुख्य अधिकारी असतील असा इशारा मनसे शहराध्यक्ष पंकज उमासरे यांनी दिला आहे.

## मालवाहतूक गाड्यांमुळे वाहतूक कोंडी



**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहरातील वाहतूक कोंडी समस्या दिवसेंदिवस वाढत जात असून ट्रॅफिक पोलीस नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करताना दिसतात. परंतू, बाजारपेठ व टिळक रस्ता मार्गावरील किराणा दुकानदार वर्दळीच्या रस्त्यावर मालवाहतूक वाहन उभे करून वाहनातील किराणा सामान उतरवे पर्यंत एकाच ठिकाणी वाहन उभे करीत असल्याने वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होते. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुकानदारांवर पोलिस दंडात्मक कारवाई करणार का असा प्रश्न त्रस्त पादचाऱ्यांकडून केला जातोय.

कायम वर्दळीच्या मार्गावर बाजारपेठ, अरूंद रस्ते त्यातच बहुतांश व्यापारी किराणा सामान घेऊन येणारे सहाचाकी मालवाहतूक वाहन दुकानाच्या बाजूला उभे करून ठेवतात. यावेळी इतर सहाचाकी, चारचाकी वाहने आल्यावर पुरेसा रस्ता नसल्याने वाहनचालक आपले वाहन कसरत करत पुढे नेण्याचा प्रयत्न करतात यामुळे अनेक वेळा वाहतूक कोंडी निर्माण होते. नगरपरिषद व पोलीस ठाण्यातून व्यापारी वर्गाला मालवाहतूक वाहनांची वेळ ठरवून दिलेली आहे परंतु, व्यापारी वर्गाने याकडे दुर्लक्ष केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुने बसस्थानक हा मार्ग अनधिकृत फेरी विक्रेत्यांनी व्यापला आहे. फास्ट फुड पदार्थ विक्रेते, फळ-भाजी विक्रेते, चप्पल विक्रेते, कापड विक्रेते हे रस्त्याच्या कडेला हातगाड्या उभ्या करीत असल्याने अनेकदा ग्राहक तिथेच दुचाकी, चारचाकी उभी करीत खरेदी करतात. या अनुषंगाने वाहतूक कोंडीत आणखीन भर पडते. या अनधिकृत फेरी विक्रेत्यांवर प्रशासनाने कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## उरण महाविद्यालयात युवा दिन साजरा

**| उरण | प्रतिनिधी |**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील रेड रिबीन क्लब च्या वतीने पुढाकार घेऊन एचआयव्ही एड्स यासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांच्या मार्गदर्शनाखालील संपन्न झालेल्या या कार्यक्रमात एचआयव्ही समुपदेशक माननीय महादेव पवार उरण व टेक्निशियन तृप्ती परजने उपस्थित होत्या. यावेळी महादेव पवार यांनी एचआयव्ही ची कारणे विशद करताना गरोदर माता पॉझिटिव्ह असेल तर मुलाला याच्यावर होतो, एचआयव्ही पॉझिटिव्ह रक्त घेतले तर, तसेच महत्त्वाचे म्हणजे असुरक्षित यौन संबंधातून एचआयव्ही होतो याविषयी त्यांनी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. ए. के. गायकवाड यांनी केले तर उपस्थितांचे आभार व अध्यक्षीय समारोप आयक्यूएसी समन्वयक डॉ. ए.आर चव्हाण यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## 'दुकानांसमोरील अवैध पार्कींग टाळा'

**तळा पोलिसांचे व्यापाऱ्यांना आवाहन**

**| तळा | प्रतिनिधी |**

गणेशोत्सव काळात बाजारपेठेतील दुकानासमोर होणारी अवैध पार्किंग टाळावी असे आवाहन तळा पोलिसांकडून बाजारपेरपेठेतील व्यापाऱ्यांना करण्यात आले आहे. गणेशोत्सव सण कोकणात मोठ्या उत्साहात साजरा केला जात असल्याने या सणासाठी मोठ्या प्रमाणावर चाकरमानी आपल्या गावी दाखल होतात. यामुळे याकाळात बाजारपेठेत विविध साहित्य खरेदीसाठी नागरिक येत असल्याने खरेदी करताना आपली दुचाकी व चारचाकी वाहने दुकानासमोर कशीही पार्क करून ठेवतात. यामुळे बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. तसेच तालुक्याचे बसस्थानक हे बाजारपेठेत असून सणांच्या काळात काही नागरिक हे फुटपाथवर व रस्त्याच्या कडेलाच आपली दुकाने लावत असल्याने एसटीला मोठी अडचण निर्माण होते परिणामी वाहतूक कोंडी होऊन नागरिकांना विविध समस्येला सामोरे जावे लागते त्यामुळे गणेशोत्सव काळात व्यापाऱ्यांनी आपल्यामुळे वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घ्यावी असे आवाहन करतानाच जे व्यापारी वाहतूक कोंडीला जबाबदार असतील अशा व्यापाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा ईशाराही यावेळी तळा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

### नवघर शाळेत वाचनालयाचे उद्घाटन

**पाली/गोमाशी :** नवघरमधील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, शब्दसंग्रह वाढविणे, भाषिक कौशल्य निर्माण करणे, विचार करण्याची क्षमता वाढविणे, ज्ञानाची कक्षा उंचावणे, जगा-तील विविध घडामोडीची माहिती मिळविणे या हेतूने ग्राम युक्ती संस्थेच्या माध्यमातून संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन सूर्यकुमार राव व संचालिका नागमणी राव यांनी शाळेसाठी वाचनालय बांधून दिले आहे. या वाचनालयाचे उद्घाटन १५ ऑगस्ट रोजी सूर्यकुमार राव व नागमणी राव यांच्या हस्ते करण्यात आले.

**योगासने-कुस्तीने स्पर्धेचा प्रारंभ | यशस्वी खेळाडूंची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी होणार निवड**

# पावसाळी क्रीडा महोत्सवाला सुरुवात

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुका पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या माध्यमातून पावसाळी क्रीडा महोत्सवाला सुरुवात झाली आहे. एक महिनाभर तालुक्यातील वेगवेगळ्या शाळांमध्ये पावसाळी क्रीडा स्पर्धा खेळविल्या जाणार आहेत. या स्पर्धांचा शुभारंभ कर्जत येथील अभिनव ज्ञान मंदिर शाळेत योगासने आणि कुस्ती स्पर्धेने झाला.२१ ऑगस्ट ते २१ सप्टेंबर या कालावधीत कर्जत तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धा खेळलेल्या जाणार आहेत.

तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ तालुका गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे यांचे हस्ते श्रीफळ वाढवून झाला. त्यावेळी केंद्रप्रमुख मोहन पाटील, अभिनव शाळेचे मुख्याध्यापक शिंदे, तालुका क्रीडा समन्वयक किशोर पाटील आणि समीर येरुणकर आदी उपस्थित होते.



तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धेत कॅरम, कराटे, हॉलीबॉल, बुद्धिबळ, योगा, योगासने, बॅडमिंटन, कुस्ती, कबड्डी, खो खो आणि धावण्याच्या तसेच मैदानी स्पर्धा खेळलेल्या जाणार आहेत. पावसाळी क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ योगासने स्पर्धा आणि कुस्ती स्पर्धेने झाला. त्यासाठी कर्जत शहरातील अभिनव शाळेत असलेल्या कुस्ती हॉल मध्ये या दोन्ही स्पर्धा झाल्या. मुले आणि मुली या दोन गटातील वेगेवेगळ्या वयोगट या दोन्ही स्पर्धा खेळवल्या गेल्या. या स्पर्धांमध्ये यशस्वी होणारी खेळाडूंना जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड होणार आहे.

### स्पर्धेचा निकाल

**१९ वर्ष मुले**
५७ किलो वजनी गट सुचित बोडके
६५ किलो वजनी गट आदित्य पोखरणीकर
**१९ वर्षे मुली**
५५ किलो वजनी गट मृदुला शिंदे
५० किलो वजनी गट रिमझिम शर्मा
**१७ वर्षे मुले**
४१ ते ४५ वजनी गट तुषार मुरमारे
४८ किलो वजनी गट सोहम रुटे
५१ किलो वजनी गट वेदांत लोभी
६०.. किलो वजनी गट आयुष्य माने
६५ किलो वजनी गट दुर्वेश दुघड
७१ किलो वजनी गट निखिल मस्कर
८० किलो वजनी गट ओंकार जोशी
**१७ वर्षे वयोगट मुली**
४९ किलो किलो वजनी गट सलोनी लोवंशी
५३ किलो वजनी गट योगिता पाटील
६१वजनी गट वेदिका थोरात
६५ किलो वजनी गट श्रावणी जाधव
**१४ वर्षे मुले**
वजन गट ३५ किलो विजेता विघ्नेश चांदेरे
३८ किलो वजनी गट कौस्तुभ ऐनकर
४१ किलो वजनी गट सिद्धार्थ भालेराव
४४ किलो वजनी गट राज मिनमीने
४८ किलो वजनी गट प्रथमेश सावळे
५२ किलो वजनी गट अथर्व दहिफळे
५७ किलो वजनी गट युवराज काळगे
१४ वर्षे मुली वजनी गट
३० किलो मयुरी देवळे
३६ किलो वजनी गट केतकी लोभी
५४ किलो वजनी गट संस्कृती लबडे
६२ किलो वजनी गट तनिष्क देशमुख

# मोहिमा संरक्षण दलांच्या



मित्रमैत्रिणींनो, आपल्या देशावर संकट आलं की संरक्षण दलं सज्ज होतात. शत्रूचं आव्हान परतवून लावतात. आपलं लष्कर, नौदल आणि हवाई दल विविध मोहिमा राबवतं. या मोहिमांमध्ये आपले धाडसी सैनिक सर्वस्व पणाला लावतात. भारतीय संरक्षण दलांनी आजवर राबवलेल्या अशाच काही मोहिमांविषयी...

**जाणून घ्या**

- भारताने कारगिल युद्धात विजय मिळवला. भारताची ही मोहीम ऑपरेशन विजय म्हणून ओळखली जाते. भारतीय क्षेत्रात घुसखोरी केलेल्या पाकिस्तानी सैन्याला परतवून लावण्यासाठी ही मोहीम आखण्यात आली होती. २६ जुलै १९९९ हा दिवस कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो.
- जुलै २०१६ मध्ये दक्षिण सुदानमधल्या अंतर्गत युद्धात ६०० भारतीय अडकून पडले होते. त्यांना यशस्वीपणे सोडवून आणण्यासाठी संकटमोचक ही मोहीम राबवण्यात आली आणि ती यशस्वीही ठरली.
- उत्तराखंड तसंच हिमाचल प्रदेशमध्ये २०१३ च्या जून महिन्यात पावसाने धुमाकूळ घातला. या पावसात हजारो लोक अडकले होते. या लोकांना वाचवण्यासाठी भारताच्या हवाई दलाने 'ऑपरेशन राहत' ही मोहीम राबवली होती.
- 'हुडहूड' नावाच्या चक्रीवादळाने २०१४ मध्ये आंध्र प्रदेश, विशाखापट्टणम आणि ओरिसाच्या किनारपट्टीच्या भागात धुमाकूळ घातला होता. या वादळातून लोकांना सोडवण्यासाठी 'ऑपरेशन लहर' ही मोहीम राबवण्यात आली होती.

# असा आहे हँडबॉल

**फन टाईम**

दोस्तांनो, फुटबॉल, व्हॉलिबॉल हे खेळ तुम्हाला माहीत असतील. यासोबतच हँडबॉल नावाचा एक क्रीडाप्रकार आहे. जपानमध्ये नुकतीच महिलांची जागतिक हँडबॉल अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. या निमित्ताने हँडबॉलविषयी जाणून घेऊ..

- हँडबॉल हा सांघिक खेळ आहे. हँडबॉलच्या एका संघात सात खेळाडू असतात. फुटबॉलमध्ये पायांनी बॉल मारायचा असतो. विरुद्ध संघाच्या गोलजाळ्यात बॉल गेल्यावर गोल होतो. हँडबॉलचंही तसंच आहे. यातही बॉल विरुद्ध संघाच्या गोलजाळ्यात टाकावा लागतो.
- हँडबॉलचचा एक सामना तासभराचा असतो. यात अर्ध्या तासाचे दोन हाफ असतात. हँडबॉल हा खूप वेगवान खेळ आहे. यात खेळाडू एकमेकांच्या अंगाला स्पर्श करू शकतात.
- हँडबॉल हा इनडोअर गेम आहे. पण हँडबॉलचे काही प्रकार मैदानात खेळले जातात. 'फील्ड हँडबॉल', 'चेक 'हँडबॉल', 'बीच हँडबॉल' हे आउटडोअर हँडबॉलचे काही प्रकार आहेत.
- या खेळात पाय सोडून शरीराच्या कोणत्याही भागाने बॉलला स्पर्श करता येतो. फुटबॉलमध्ये बॉल डोक्याने मारता येतो. पण हँडबॉलमध्ये ही परवानगी नसते. गोलकीपर पायांनी बॉल अडवू शकतो. तसंच त्याला बॉल अडवण्यासाठी शरीराच्या कोणत्याही भागाचा वापर करता येतो.



# कांदा चिरताना...

**वाचा तर खरं**

मित्रांनो, कांदा चिरायला सुरुवात करताच आपल्या डोळ्यांतून पाणी येते. तुम्हीही हे अनुभवले असेल. कांदा चिरताना आई-बाबांचे डबडबलेले डोळेही पाहिले असतील. पण असे का होते, याचा कधी विचार केला आहे? चला, आज यामागील कारण पाहू या.

मुलांनो, कांद्याच्या थरांमध्ये खूप बारीक पेशी असून त्यामध्ये सल्फर संयुगे आणि एंजाइम असतात. सहसा हे दोन्ही वेगळे राहतात. परंतु सुरीने कांद्याच्या पेशी विलग होऊ लागतात ते घटक एकत्र येतात आणि या रासायनिक अभिक्रियेमुळे एक तीव्र वायू निर्माण होतो. त्याला लॅक्रिमॅटरी फॅक्टर म्हणतात. या वायूमुळे डोळ्यांची आग होते. पाणी येते.

आपले डोळे खूप संवेदनशील असतात आणि कोणत्याही प्रकारच्या हानिकारक रसायनापासून किंवा वायूपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी ते लगेच प्रतिक्रिया देतात. म्हणूनच कांद्यातून उत्सर्जित होणारा वायू डोळ्यांच्या संपर्कात येतो तेव्हा डोळे त्याला धोकादायक पदार्थ मानतात आणि हा धोका टाळण्यासाठी डोळ्यांच्या अश्रू ग्रंथी लगेच अश्रू सोडू लागतात. अश्रूंचे काम हा वायू धुवून टाकण्याचे असते जेणेकरून डोळे सुरक्षित राहू शकतील.

शास्त्रज्ञांचा विश्वास आहे की ही कांद्यामधील एक नैसर्गिक संरक्षण यंत्रणा आहे. निसर्गानेच कांद्याला असे रसायन बनवण्याची क्षमता दिली आहे, जेणेकरून कोणताही कीटक किंवा प्राणी हानी पोहोचवू शकणार नाही. स्वाभाविकच अनेक प्राणी कांद्यापासून लांब राहतात. मात्र तुम्हाला कधी कांदा चिरण्याची वेळ आली आणि डोळ्यांची जळजळ टाळायची असेल तर एक काम करा. चिरण्यापूर्वी कांदा १०-१५ मिनिटे फ्रिजमध्ये ठेवा. थंड कांदे कमी गॅस सोडतात. दुसरे म्हणजे धारदार चाकू वापरा. यामुळे कांद्याच्या पेशी कमी तुटतील आणि कमी गॅस निर्माण होतो. कांदे कापताना जवळच पाण्याने भरलेले भांडे ठेवा किंवा कापण्यापूर्वी कांदा पाण्यात बुडवा. यामुळेही गॅस पाण्यात विरघळेल आणि डोळे जळजळणार नाहीत.



**ठिपके जुळवा**



# जमाना स्टार्ट अप्सचा

**कोण होणार?**

दोस्तांनो, तुम्ही स्टार्ट अप या संकल्पनेबद्दल ऐकलं असेल. अनेकजण स्वत:ची स्टार्ट अप सुरू करतात. स्टार्ट अप म्हणजे स्वत:ची कंपनी. कोणत्याही शाखेतली पदवी मिळवल्यानंतर स्टार्ट अप सुरू करता येईल. ही स्टार्ट अप्स वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये काम करतात. कमी भांडवल असलं तरी स्टार्ट अप्स सुरू करता येतात. कमी भांडवलात कोणती स्टार्ट अप्स सुरू करता येतील याविषयी माहिती असायला हवी. भविष्यात तुम्हीही या स्टार्टअप्सचा विचार करू शकता.

1. छायाचित्रणाच्या क्षेत्रात अनेक संधी आहेत. इव्हेंट फोटोग्राफर म्हणून तुम्ही नाव कमवू शकता. फोटोग्राफीचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर दर्जेदार कॅमेरा घेऊन करीअरला सुरुवात करता येईल. यासाठी फारशा भांडवलाची गरज नसते. पुरेसा अनुभव मिळाला की स्वत:ची फोटोग्राफी प्रशिक्षण संस्थाही सुरू करता येते.
2. भारतात चारचाकी वाहनांची बाजारपेठ विस्तारते आहे. तुम्हीही गाड्यांच्या विक्रीचा व्यवसाय सुरू करू शकता. सेकंड हँड गाड्यांचीही विक्री करता येईल.
3. देशभरात वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ होत आहे. त्यामुळे वाहन चालवण्याचे धडे देण्यासाठी प्रशिक्षकांची गरज असते. ड्रायव्हिंग स्कूलच्या माध्यमातून वाहन चालवण्याचं प्रशिक्षण दिलं जातं. हा व्यवसायही चांगला नफा मिळवून देतो.
4. ब्युटी पार्लर किंवा स्पा क्षेत्राशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करून स्वत:चं पार्लर किंवा स्पा सुरू करता येईल. या व्यवसायातही अनेक संधी आहेत.



# असं का?

## डास चावल्यानंतर का येते खाज?

मुलांनो,डास चावल्यानंतर तो भाग खाजू लागतो. अंगावर छोटासा फोडही येतो. असं का बरं होत असावं? माणसाच्या शरीरातून रक्त शोषण्यासाठी डास डंख मारतो. डासाचा डंख आपल्या शरीरात जातो. डासाने डंखआणि वारंवार मारल्यावर आपल्या शरीरातल्या रक्ताची गुठळी होते. रक्त शोषून घेताना डासाच्या शरीरात एका रसायनाची निर्मिती होते. हे रसायन माणसाच्या शरीरात गेल्यावर खाज सुटते. डास चावल्यानंतर माणसाच्या शरीराचा तो भाग संवेदनशील बनातो. सतत खाजवल्यामुळे त्या भागावर सूज येते. तसंच जंतूसंसर्गाचा धोकाही असतो. त्यामुळे डास चावल्यावर वारंवार खाजवणं टाळायला हवं.



## थंडीत का येतात मुंग्या?

मुलांनो, थंडीत हातापायांना सारख्या मुंग्या येतात. तापमान खूपच कमी झालं असेल तर हातापायांना मुंग्या येण्याचं प्रमाण वाढतं. सर्वसाधारणपणे आपले हात आणि पाय उघडे असतात. बाहेरच्या थंडीमुळे शरीराच्या उघड्या भागातलं रक्त गोठायला सुरुवात होते. गोठल्यामुळे रक्त वाहण्याची गती मंदावते. यामुळे हातापायांना मुंग्या येतात. याच कारणामुळे हातापायांची ताकदही कमी होते. थंड पाण्यात हात घातल्यानंतरही असं होतं.



# जगात कुत्र्यांची संख्या किती?

**माहिती असावे**

छोट्या दोस्तांनो, सध्या तुम्ही भटके कुत्रे, कबुतरांना दाणा-पाणी घालण्यावरुन सुरू असणारा वाद ऐकत असाल. पण मित्रांनो, ही केवळ आपल्या देशातील समस्या नाही. जगातील अनेक देशांमध्ये जास्त प्रमाणात कुत्रे आहेत. चला, जाणून घेऊ या कुत्र्यांची आकडेवारी...

कुत्र्यांची संख्या सर्वाधिक असणाऱ्या टॉप १० देशांच्या यादीत दहावा क्रमांक रोमानियाचा लागतो. इथे कुत्र्यांची संख्या सुमारे ४१ लाख आहे. १९८० च्या दशकात लोक गावांमधून शहरांमध्ये स्थलांतरित झाले, तेव्हा बरेच कुत्रे मागे राहिले आणि हळूहळू भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली. एकेकाळी, संख्या नियंत्रित करण्यासाठी त्यांना मारले जात होते. परंतु प्राणी हक्क संघटनांच्या निषेधानंतर ती थांबवावी लागली. त्यामुळे येथे भटक्या कुत्र्यांची समस्या मोठी आहे.

* फ्रान्समध्ये सुमारे ७४ लाख कुत्रे आहेत. तेथे प्रत्येक पाळीव कुत्र्याला मायक्रोचिप बसवून लसीकरण करणे आवश्यक आहे. या कारणास्तव, रेबीजचे प्रमाण खूप कमी आहे. तथापि, दरवर्षी लाखो कुत्रे सोडून दिले जातात आणि भटक्या कुत्र्यांचे प्रमाण वाढते.
* या यादीत आठव्या स्थानी अर्जेंटिना असून तेथे सुमारे ९२ लाख कुत्रे आहेत. सरकार वेळोवेळी लसीकरण आणि नसबंदी मोहिमा राबवून त्यांची संख्या नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत असले तरी यश आलेले दिसत नाही.
* यादीत सातव्या स्थानी फिलीपिन्स असून तेथे कुत्र्यांची संख्या १.१६ कोटी आहे. स्वाभाविकच रेबीजमुळे होणारे मृत्यू हा येथील चिंतेचा विषय होते. सरकार कुत्र्यांना मारण्याऐवजी लसीकरण आणि नसबंदीचा अवलंब करत आहे.
* जपान या यादीमध्ये सहाव्या स्थानी आहे. तेथे सुमारे १.२० कोटी कुत्रे आहेत. येथे बरेच लोक मुलांऐवजी पाळीव कुत्र्यांना कुटुंबाचा भाग मानतात. यामुळेच जपानचा पाळीव प्राणी उद्योग १० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे.
* यादीमध्ये पाचव्या स्थानी असणाऱ्या रशियामध्ये सुमारे १.५० कोटी कुत्रे आहेत. येथे 'मेट्रो डॉग्स' म्हणून ओळखली जाणारी भटकी कुत्री तर ट्रेन आणि बसमध्ये प्रवास करायला शिकली आहेत. सरकार आणि सामान्य लोक एकत्रितपणे त्यांची काळजी घेतात.
* कुत्र्यांच्या संख्येबाबत भारत जगात चौथ्या क्रमांकावर असून आपल्याकडे सुमारे १.५३ कोटी भटके कुत्रे आहेत. अर्थातच हे देशापुढील मोठे आव्हान असून सरकारने पुढील वर्षभरात ७० टक्के कुत्र्यांचे लसीकरण आणि निर्जंतुकीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.
* तिसऱ्या स्थानी असणाऱ्या चीनमध्ये २.७४ कोटी कुत्रे आहेत. पूर्वी तेथील काही शहरांमध्ये कुत्रे पाळण्यावर बंदी होती, परंतु आता लोकांनी कुत्रे पाळण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे चीनमधील पाळीव प्राणी बाजारपेठ देखील वेगाने वाढली आहे.
* यादीत दुसऱ्या स्थानी असणाऱ्या ब्राझीलमध्ये सुमारे ३.५७ कोटी कुत्रे आहेत. मात्र सरकारने लसीकरण आणि काळजी घेण्यासाठी चांगली व्यवस्था स्थापन केली आहे.
* जगभराचा विचार केला तर या यादीमध्ये अमेरिका अव्वल स्थानावर असून तेथे सुमारे ७.५८ कोटी कुत्रे आहेत. पाळीव प्राण्यांच्या काळजीसाठी तेथे विशेष डॉग पार्क, ग्रूमिंग सेंटर आहेतच खेरीज त्यांचे संरक्षण करणारे कडक कायदेही आहेत. प्राण्यांवरील क्रूरतेच्या प्रकरणांमध्ये इथे कठोर कारवाई केली जाते.



# अन्नाची नासाडी टाळण्यासाठी...

**समाजभान**

मुलांनो, सध्या लग्नाचा हंगाम आहे. लग्नप्रसंगी भरपूर प्रमाणात अन्न शिजवलं जातं. पार्ट्यांमध्येही विविध प्रकारचे खाद्यपदार्थ असतात. हे पदार्थ भरपूर प्रमाणात तयार केले जातात. लग्न, पार्ट्यांमधलं जेवणं उरतं. बरेचदा घरातलं जेवणही उरतं. आपण बाहेरचं खाल्ल्यावर घरी केलेले पदार्थ टाकून दिले जातात. पण अन्नाची नासाडी होता कामा नये. या जगात अनेकांना अन्न मिळत नाही आणि आपण अन्न वाया घालवतो. अन्न वाया घालवणं योग्य नाही. अन्नाची नासाडी टाळण्यासाठी काय करता येईल याविषयी...

- हॉटेलमध्ये गेल्यावर उगाचच भरपूर पदार्थ मागवून ठेवू नका. सुरुवातीला थोडंच मागवा. अजून लागलं तरच ऑर्डर द्या. भरपूर पदार्थ मागवल्यामुळे अन्न आणि पैसे दोन्हीही वाया जातात.
- घरात पार्टीचं आयोजन केल्यानंतर भरपूर अन्न उरलं तर ते टाकून देऊ नका. हे अन्न गरीबांना वाटा. बऱ्याच संस्था उरलेलं अन्न घरातून घेऊन जातात आणि गरीबांना वाटतात. अशा संस्थांचा शोध घ्या. लग्नसमारंभांमध्येही ही संकल्पना लढवता येईल.
- घरचं अन्न वाया घालवू नका. बाहेर खाणार असाल तर आईला तसं कळवा. घरी जेवण केलं असेल तर उगाचच बाहेर खाऊ नका.
- आपल्या मित्रमैत्रिणींनाही याबाबत सांगा. अशा संस्थांची माहिती द्या. अन्न वाया घालवणं किती चुकीचं आहे याची जाणीव करून द्या.







**दोस्त हे मस्त**

## जग किटकांचं

फ्युनेल वेब स्पायडर हा जगातला सर्वात विषारी कोळी आहे. ड्रॅगनफ्लाय ही माशी सहा महिने जगते. डासांची लांबी जवळपास १६ मिलीलीटर इतकी असते. डास आपल्या वजनाच्या तीन पट अधिक रक्त शोषू शकतो. या पृथ्वीवरच्या एका फुलपाखराचं नाव ८९९८ आहे. कारण याच्या एका पंखावरची नक्षी ८९ या आकड्यासारखी तर दुसऱ्या पंखावरची नक्षी ९८ या आकड्यासारखी दिसते.



**खादाडी**

## पीनट बटर रॅप

संध्याकाळच्या वेळी पोटभरीचं काहीतरी खावंसं वाटतं. अशा वेळ पीनट बटर रॅप हा पदार्थ खाता येईल. यासाठी दोन चमचे पीनट बटर, एक चमचा चोको चिप्स, एक केळं, एक चमचा मध, पोळी किंवा पराठा असं साहित्य घ्या. केळ्याचे गोलाकार काप करून घ्या. पोळीवर पीनट बटर लावा. त्यावर केळ्याचे काप ठेवा. त्यावर चोको चिप्स पसरवा. त्यावर मध घाला. पोळीचा रोल करा. मस्तपैकी खा. डब्यातली पोळी उरली तर तिला अशा प्रकारे ट्विस्ट देता येईल.



**स्टडी टिप्स**

## अभ्यास गणिताचा

मुलांनो, तुम्हाला गणित हा विषय अवघड वाटतो का? गणिताची भीती वाटते का? गणिताची भीती वाटायचं काहीच कारण नाही. ही भीती घालवण्यासाठी विविध प्रयोग करता येतील. गणिताचा भरपूर सराव करायला हवा. गणितात बरीच सूत्रं असतात. गणिताची प्राथमिक सूत्र लक्षात ठेवली की तुम्हाला हा विषय सोपा जाईल. गणित हा विषय नीट समजून घेणं गरजेचं आहे.



**योगा टाईम**

## करा हलासन


मुलांनो, अभ्यास लक्षात ठेवावा लागतो. यासाठी स्मरणशक्ती चांगली असावी लागते. स्मरणशक्ती सुधारण्यासाठी वेगवेगळी आसनं करता येतील. यापैकी एक आसन म्हणजे हलासन. पण फक्त हे आसन करून भागणार नाही. तुम्ही पोषक आहार घेतला पाहिजे. हिरव्या भाज्या आणि फळं खाणं गरजेचं आहे. यामुळे तुमची स्मरणशक्ती सुधारेल आणि अभ्यास नीट लक्षात राहील.



रंगबहार

# अच्युत पोतदार यांची अनपेक्षित एक्झिट

शरद कोरडे



अच्युत पोतदार हे खरेतर प्रथम मराठी रंगभूमीवरील चतुरस्त्र अभिनेते. त्यांचा जन्म मध्यप्रदेशातील जबलपूर येथे झाला असला तरी कलाकार म्हणून त्यांची नाळ जुळली ती महाराष्ट्रांशी. त्यांच्या वयाच्या पंचेचाळिसाव्या वर्षी ते रंगभूमीशी जोडले गेले. त्यांचे बालपण इंदुरशी जोडले गेले होते. त्यांचे शालेय शिक्षणही तेथेच झाले. इकॉनॉमिक्स मध्ये त्यांनी पोस्ट ग्रॅज्युएशन केले. मध्यप्रदेशांतील रेवा येथील कॉलेजमध्ये त्यांनी काही काळ प्राध्यापकी केल्यानंतर इंडियन आर्मीमध्ये प्रवेश घेतला. तेथून कॅप्टन म्हणून त्यांनी निवृत्ती घेतल्यावर त्यांनी १९६७ मध्ये इंडियन ऑईलमध्ये सुमारे २५ वर्षे नोकरी केली. या काळातच त्यांना कलाक्षेत्राशी संबंध झाला. कंपनीच्या सांस्कृतिक कार्यक्रमांतून त्यांनी नाटके बसविण्यास सुरूवात केली. नाटकाच्या आवडीमुळे ते मुंबईस बदली घेऊन आले.

मुंबईत त्यांचा संपर्क नाटककार व नाट्यप्रशिक्षक सत्यदेव दुबे यांच्याशी आला. सुमारे पंचाहत्तर प्रायोगिक नाटकांतून त्यांनी वेगवेगळ्या भूमिका साकारल्या.

महेश एलकुंचवार यांच्या 'वाडा चिरेबंदी' या नाटकात दिग्दर्शिका विजया मेहता यांनी त्यांना त्यांतील भास्कर नामक मोठ्या भावाची भूमिका दिली. या नाटकात त्यावेळी सुलभा देशपांडे यांनी त्यांच्यासोबत काम केले होते.

या नाटकात महेश एलकुंचवार यांनी जुन्या वाडा संस्कृतीच्या पतनाचे तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या सामाजिक व आर्थिक पर्यावरणामुळे वेगाने विघटनाकडे निघालेल्या कुटूंब व्यवस्थेचे वास्तववादी चित्रण केले होते. या नाटकात वाडा संस्कृतीचे चिरे ढासळताना दाखविले होते. त्यातील माणसांच्या ताणलेल्या नातेसंबंधासह वाडा जमीनदोस्त होण्याची भीती पडछायेसारखी नाटकभर व्यापून राहिल्याचे एलकुंचवार यांनी नाटकांतून मांडली होती. घरातील मूळ पुरूष तात्याजी मृत्यू पावल्यानंतर सर्व नातेवाईक एकत्र आले आहेत व त्यातील प्रत्येकाचे वाड्याबाबत व एकत्र कुटूंबाबाबत वेगवेगळी मते असून 'वाडा' विकण्यापर्यंत काहींची मजल गेली असते. आपापसांतील गुंतागुंतीच्या ताणलेल्या संबंधांचं सूक्ष्म, तरलचित्र एलकुंचवार यांनी या नाटकात उभे केले होते. त्यातून एक समग्र जीवनानुभव उभा राहतो. १९८० च्या दशकांतील वेगळ्या विषयावरील या नाटकावर खूप चर्चा झाली व या नाटकाची दखल समीक्षकांपासून, प्रेक्षकांपर्यंत व सामाजिक कार्य करणाऱ्या समाजसुधारकांनाही घ्यावी लागली. पुढे याच नाटकाच्या अंगाने पुढील कथानके घेऊन 'एका मग्न तळ्याकाठी' व 'युगांत' ही नाटके एलकुंचवार यांनी लिहिली व ही तिनही नाटके एकाच वेळी 'त्रिनाट्यधारा' या संकल्पनेद्वारे रंगमंचावर सादर झाली व त्याची दशक रसिके प्रेक्षकांनी घेतली व त्याला उदंड प्रतिसादही मिळाला. याच काळात हिंदींतील दिग्दर्शक गोविंद निहलानी यांनी अच्युत पोतदार यांची काही नाटके पाहिली व त्यांनी त्यांच्या 'आक्रोश' या चित्रपटासाठी त्यांना निमंत्रित केले.

'आक्रोश' या चित्रपटाची कथा मराठीतील ख्यातनाम नाटककार विजय तेंडूलकर यांनी लिहिली होती. एका आदिवासी दाम्पत्यावर प्रतिष्ठित जामीनदाराने केलेल्या अत्याचाराची कथा या चित्रपटात होती. या चित्रपटात जंगल कंत्राटदाराचे काम अच्युत पोतदार यांनी केले. या चित्रपटात नासिरूद्दीन शहा, ओम पुरी, स्मिता पाटील, अरविंद देशपांडे यांच्या भूमिका होता. प्रायोगिक व समांतर चित्रपटांच्या मार्गाने जाणारा हा सिनेमा असल्याने त्यावर खुप लिहिले गेले होते व निर्मात्यांची प्रशंसाही करण्यात आली होती. १९८० साली आलेला हा हिंदी चित्रपट अच्युत पोतदार यांचा पहिला चित्रपट होता. त्यानंतर त्याच वर्षी सईद अख्तर मिर्झा यांच्या 'अल्बर्ट पिंटोको गुस्सा क्यू आता है' या समांतर चित्रपटाची मील मालकाची भूमिका अच्युत पोतदार यांनी केली. त्यानंतर 'विजेता' व राजाये मौत' या चित्रपटानंतर पुन्हा गोविंद निहलानी यांनी विजय तेंडूलकर यांची कथा असलेल्या 'अर्धसत्य' या चित्रपटासाठी त्यांना बोलावले. या चित्रपटात एका प्रामाणिक व बेडर ऑफिसरची कथा सांगण्यात आली होती. 'ओम पुरी' यांनी ती भूमिका केली होती. त्यात इन्स्पेक्टरच्या भूमिकेत अच्युत पोतदारही होते. या चित्रपटात अमरिश पुरी, स्मिता पाटील, सदाशिव अमरापूरकर, शफी इनामदार, नासिरुद्दीन शहा असे कलाकार होते. हा चित्रपट प्रेक्षकांनी डोक्यावर घेतल्याने प्रचंड चालला.

त्यानंतर अच्युत पोतदार यांनी अरूणा राजेंचा 'रिहाई', एन.चंद्रा यांचा 'तेजाब', विधु विनोद चोपडा यांचा 'परिंदा', नाना पाटेकर यांचा 'प्रहार', उमेश मेहरा यांचा 'शिकारी', अजीज मिर्झा यांचा 'राजू बन गया जंटलमन', एन. चंद्रा यांचा, 'हमला', राजीव मेहरा यांचा 'चमत्कार', शशीलाल के. नायर यांचा 'अंगार', उमेश मेहरा यांचा 'आशिक आवारा', अशोक गायकवाड यांचा 'हस्ती', राजकुमार संतोषी यांचा 'दामिनी', अजीज सेजवाल यांचा 'शतरंज', गोविंद निहलानी यांचा 'द्रोहकाल' यांच्याबरोबर रंगीला, अग्नीसाक्षी, बाल ब्रह्मचारी, मृत्यूदंड, सनम, यशवंत, आ अब लौट चले, वास्तव, हम साथ साथ है, भारत भाग्य विधाता आदी चित्रपटांतून कामे केली. त्यातील '३ एडीयट' या राजकुमार हिराजी या चित्रपटांतील प्राध्यापकाची भूमिका खूप गाजली होती. अच्युत पोतदार यांनी एकूण १२५ चित्रपटांतून कामे केली. २०१९ मध्ये आलेला 'हौसला' हा त्यांचा शेवटचा हिंदी चित्रपट होता.

अच्युत पोतदार यांनी अनेक हिंदी दूरदर्शन मालिकांतून उल्लेखनीय भूमिका केल्या. त्यात 'भारत एक खोज' व 'ऑल द बेस्ट' ह्या दूरदर्शन नॅशनलवरील मालिका 'आजतक' वरील 'आंदोलन', झी.टीव्हीवरील 'प्रधानमंत्री', 'अगले जनम मोहे बिटिया किजो', झी मराठी वरील 'माझा होशील का?' तसेच 'वागळे की दुनिया' , 'ये दुनिया गजबळी' , 'मार्शल' , 'अमिताका अमित' या दूरदर्शन मालिकेतून त्यांनी सुमारे ९५ धारावाहिक मालिकांतून व सुमारे ४५ जाहिरातींमधून कामे केली. त्यांनी मराठी व हिंदी प्रायोगिक व व्यावसायिक अशा २६ नाटकांतून कामे केली. झी मराठी वरील दूरदर्शन मालिका 'माझा होशील का?' मधील त्यांच्या 'अप्पा' या भूमिकेसाठी त्यांना सन २०२१ मध्ये जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले होते, तर इंदौर मधील एका सांस्कृतिक समूह आनंदने त्यांच्या कलाकार किर्दीसाठी व बॉलिवूडमधील त्यांच्या उल्लेखनीय कामासाठी त्यांना १६ ऑगस्ट २०१५ मध्ये जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले होते.

अच्युत पोतदार यांचा जन्म २२ ऑगस्ट १९३४ मध्ये मध्यप्रदेशांतील जबलपूर शहरात झाला होता व शिक्षण इंदौर इथे झाले होते. १९८० मध्ये ते मुंबईत जवळील ठाण्यामध्ये स्थायिक झाले. १८ ऑगस्ट २०२५ रोजी ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये दीर्घ आजाराने त्यांचा वयाच्या ९० व्या वर्षी त्यांचे निधन झाले. एक उत्तम कलाकार व उत्तम सहकारी, उत्तम माणूस म्हणून त्यांचा लौकिक होता. ●●

# मूर्तीकलेचा चिरनेरचा कुंभारवाडा

दत्तात्रेय म्हात्रे

अनेक विघ्नांवर मात करीत उरण तालुक्यातील चिरनेर कुंभारवाडा गणपती कारखानदारांनी चिकाटीने व्यवसाय करीत, यावर्षी देखील विघ्नहर्ताच्या सुमारे शेकडोहून अधिक मूर्ती तयार करून त्या विक्रीसाठी इतरत्र पाठविल्या आहेत. मूर्ती कलेचे गाव म्हणून चिरनेर कुंभारवाड्याची ओळख आहे. गेल्या आठ दहा पिढ्यांपासून येथील मूर्तिकार आपली मूर्ती बनवण्याची कला अनेक अडचणी आणि समस्यांना सामोरे जात आपली कला जोपासत आले आहेत. चिरनेर गावात प्रामुख्याने कुंभार वाड्यामध्ये कुंभार समाजाची ३५ ते ४० घरांची एकत्रित अशी वस्ती आहे. प्रत्येक कुटुंबात घरातच मूर्ती तयार करण्याचे कारखाने आहेत. गणरायाच्या मूर्ती बरोबर माती पासून विविध प्रकारची कलात्मक भांडी तयार करून आपल्या कलेचा व्यवसाय हे कलाकार चालवित असले, तरी येथील गणेश मूर्ती घडविणारे मूर्तिकार संकटाच्या सावटाखाली वावरत आहेत. मातीकामातून मूर्तिकला साकारणे या समाजाला मिळालेली दैवी देणगी आहे. कुंभाराचे स्थान समाजासाठी महत्त्वाचे आहे. परंतु निराकारातून आकार देणाऱ्या कुंभाराकडे कोणी फारसे लक्ष देताना दिसत नाही. या कुंभार समाजाला कलेच्या बाबतीत अनेक समस्यातून जावे लागत आहे. येथील कुंभार समाज आर्थिक शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेला आहे. या समाजातील बहुसंख्य लोक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत. या समाजास त्यांचे इतर मिळणारे लाभ हे त्यांना मिळत नाहीत. निर्जीव मातीत आपल्या कलेने जीव उतरणारा कुंभार समाज हा मूर्तीकलेचे काम करणारा समाज आहे. परंतु भांडवला अभावी येथील कुंभार समाजाला हा व्यवसाय करण्यासाठी मोठी आर्थिक अडचण येत आहे. रंग, माती, आणि इतर साहित्य यांच्या वाढत्या दरामुळे हा व्यवसाय भांडवली स्वरूपाचा झाला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून या मूर्ती

कलेचा वारसा चिरनेर कला नगरीला लाभला असून स्व. शांताराम चौलकर, स्व. गणू चिरनेरकर, स्व. पोसू चौलकर, स्व. दगडू चौलकर स्व. दत्तात्रेय चिरनेरकर, स्व. जगन्नाथ हातनोलकर, स्व. सिताराम हातनोलकर तसेच येथील अनेक नामवंत मूर्तिकारांनी या कलेचे आणि चिरनेर कलानगरीचे नाव उज्वल करण्यात मोठे योगदान दिलेले आहे. त्यांच्या या कलेचा पिढीजात वारसा पुढील पिढ्यांनी देखील तेवढ्याच समर्थपणे पुढे नेऊन, चिरनेर कलानगरीच्या नाव लौकिकात मोलाची भर टाकण्याचे काम अव्याहतपणे सुरू ठेवलेले आहे. अनेक मूर्तिकारांच्या पाचव्या सहाव्या पिढ्या या व्यवसायात कार्यरत आहेत. उत्कृष्ट रंगसंगती, भावमुद्रा, सजीवपणा दर्शविणारी आखणी अशी चिरनेर कलानगर येथील गणेश मूर्तीची खासियत आहे. परंतु बाहेरील गणेश मूर्तीच्या आक्रमणामुळे येथील गणेश मूर्तीच्या मागणीत आत्ता मोठ्या प्रमाणावर घट झाली असल्याचे येथील मूर्तिकारांनी सांगितले. शिल्पसाद कला मंदिराचे संस्थापक गजानन चौलकर, संचालक प्रसाद चौलकर यांच्या घराण्याचा मूर्तिकलेत नावलौकिक आहे. दरवर्षी गणेशोत्सवात त्यांच्या कारखान्यात गणरायाची विविध रूपे आपल्याला पाहायला मिळतात. बालगणेशापासून विविध ब्रह्म, विष्णू ,महेश या त्रिदेवतांच्या गणेशरुपी मूर्ती तसेच पेशवाई, लालबागचा राजा, दगडूशेठ हलवाई, छत्रपती शिवाजी महाराज, तुळजाभवानी, साईबाबा या मूर्तीची त्यांची विशेष खासियत असून, या विविध रूपातील गणेशमूर्ती या ८० टक्के शाडू मातीच्या आहेत. मूर्तिकार तथा शिल्पकार प्रसाद चौलकर हा या व्यवसायात असून, त्यांनी १९९८ मध्ये जे. जे. स्कूल आर्ट मध्ये प्रवेश घेऊन जी. डी. आर्ट शिल्पकला व मॉडेलिंग हा चार वर्षाचा कोर्स पूर्ण करून, मॉडेलिंग मास्टर पदवी प्राप्त केली आहे. दरम्यान आपल्या शिल्पकलेचा श्री गणेशा केला तो आपल्या आजीचे अर्धशिल्प रेखाटून. यानंतर प्रसाद चौलकर यांनी गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, इंदिरा गांधी अशी बोलक्या स्वरूपाची अनेक शिल्पे रेखाटली आहेत. त्यांची ही शिल्पे जगात पोहोचली आहेत. त्यांच्या गणेश मूर्तीच्या आकारात रेखीवपणा आणि चेहऱ्यावरील भावप्रदर्शनात अचूकपणा, रंगसंगती ही त्यांच्या अंगभूत कलेची खासियत आहे. तर उत्कृष्ट रंगसंगती सजीवपणा दर्शविणारी आखणी ही नंदकुमार चिरनेरकर, सुनील चौलकर संदेश चौलकर यांच्या मूर्तीकलेची खासियत असून त्यांची मूर्तीकला मनाचा ठाव घेणारी आहे. पर्यावरण पूरक शाडू मातीच्या सुबक मूर्ती, आकर्षक रंगसंगती व कौशल्य यामुळे गणेशभक्त चिरनेरच्या गणेश मूर्ती पसंत करीत होते. मात्र आता बाहेरील गणेश मूर्तीच्या आक्रमणामुळे येथील गणेश मूर्तीच्या मागणीत खूप मोठी घट झाली असल्याचे मूर्तिकारांकडून सांगण्यात आले. मातीपासून वेगवेगळ्या प्रकारच्या मूर्ती व कलात्मक भांडी तयार करून विकणे, हा कुंभार समाजाचा मुख्य व्यवसाय आहे. परंतु शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यापासून हा समाज वंचित आहे. निर्जीव मातीत आपल्या कलेने जीव ओतून गणेशमूर्तीचे उत्पादन करणारा हा समाज आहे. या व्यवसायाला लागणारी माती, रंग, जागा आणि आर्थिक पाठबळ या बाबींमुळे हा व्यवसाय भांडवली स्वरूपाचा झाला आहे. चिरनेरसारख्या ग्रामीण भागातील मूर्तिकारांना शासनाने जागा उपलब्ध करून द्यावी, तसेच बँकांनी अर्थसहाय्य करावे, तरच येथील मूर्तीकला अस्तित्वात राहील. ●●



**सध्या कोकणात एकच चर्चा आहे ती म्हणजे कोकणच्या लाल मातीच्या संस्कृतीला रुपेरी पडद्यावर साकारणारी भव्य दिव्य मराठी चित्रपट 'दशावतार' याच्या प्रदर्शनाची!**

# बिग बजेट 'दशावतार' चित्रपट म्हणजे प्रेक्षकांच्या गर्दीचं नवे वादळ




धनंजय शेटये

कोकणच्या निसर्गरम्य भूमीमध्ये अनेक चित्रपटांचे छायाचित्रण झाले असेल. कोकणच्या लालमातीशी जोडलेले कथानक अनेक चित्रपट, नाटक, टीव्ही सिरियल मध्ये आपण पाहिल्या असतील पण असा पहिला चित्रपट येत आहे जो मराठी चित्रपट सृष्टीला 'माईल स्टोन' ठरेल. अनेक लोक सुट्टीचा आनंद घेण्यासाठी परदेशी जाण्याचा प्रयत्न करतात पण कोकणी माणूस आपल्या कोकणाकडे का वळतो? यांचे उत्तर पाहिजे असेल तर 'दशावतार' मराठी चित्रपट नक्कीच पाहा. कोकणच्या भूमीत दिग्गज कलावंत निर्माण झाले. अनेक नामांकित लेखक घडले, अभिनेते घडले. क्रिकेट जगतासाठी प्रचंड योगदान दिले.अशा कोकणच्या कलावंताना घडविणारी कला म्हणजे कोकणचा दशावतार. नाट्य कलेच्या इतिहासात आद्य कला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कोकणमध्ये प्रत्येक गावामध्ये जत्रेला दशावतारी नाट्यप्रयोग सादर केला जात आहे. हजारो वर्षे चालत आलेली ही परंपरा रितीरिवाज आहे. पूर्वीच्या काळातील फक्त लिखित स्वरूपात ही नाट्यकला उपलब्ध नसल्याने पुरावे आढळत नाहीत. ण कोणतीही स्क्रिप्ट न घेता, कोणतेही लिखित डायलॉग, कथानक न घेता दशावतारी कलावंत स्टेजवर संवादाची जुगलबंदी सुरू करतात. बरं हे अनुभवाने एवढं परफेक्ट जमत की कमालच आहे.

दशावतारी नाटक हे संगीतनाटक असते. तसेच स्वतःची वेशभूषा, मेकअप स्वतःलाच करावा लागतो. एवढं सारं असलं तरी गेली कित्येक वर्षे दशावतारी नाटक कोकणच्या संस्कृतीवर अधिराज्य गाजवत आहेत. अगदी बालपणापासून कोकणच्या प्रत्येक मुलाला आपोआप दशावतारी कलेचे बाळकडू मिळत जाते आणि म्हणूनच कोकणच्या लाल मातीतून प्रतिभावंत अभिनेते घडत आहेत. 'दशावतार' चित्रपटाच्या 'आवशीचो घो' या गाण्याने तर सगळीकडे अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर अभिनित दशावतार चित्रपटाची जाहिरात पाहुन प्रेक्षकांची उत्सुकता अणि उत्कंठा शिगेला पोहोचली आहे.या चित्रपटातील मनाला भिडणारी आणि कोकणी मालवणी संस्कृतीचं यथार्थ दर्शन घडविणारी अवीट गाणी आणि खुमासदार शैलीत संवादलेखन लोकप्रिय गीतकार गुरु ठाकूर यांनी लेखन आहे. अतिशय तगडी स्टारकास्ट महेश मांजरेकर, सुनील तावडे, प्रियदर्शनी इंदुलकर, रवि काळे, भरत जाधव तसेच गुरु ठाकूर यांनी सुद्धा प्रथमच या चित्रपटात अभिनय केला आहे त्यामुळे 'दशावतार' चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणार असल्याची चर्चा प्रदर्शनापूर्वीच केली जात आहे.

**सुबोध खानोलकर यांच्याबद्दल :**

**'तुझ्यात जीव रंगला',**

'भागो मोहन प्यारे', 'माझा होशील ना', सध्याची लोकप्रिय मालिका 'कमळी' अशा अनेक यशस्वी मालिका देणारे आणि 'संदूक', 'हापूस' सारख्या लोकप्रिय चित्रपटाचे लेखक सुबोध खानोलकर यांनी या चित्रपटाच्या कथा - पटकथा लेखनाबरोबरच दिग्दर्शनाची धुरा प्रथमच स्वतंत्रपणे सांभाळली आहे. गुरू ठाकूर यांनी संवाद आणि गीतलेखन केलं आहे. तर ए व्ही प्रफुल्लचंद्र यांनी संगीत दिलं आहे.

सुबोध खानोलकर यांनी व्यक्त केल्या भावना : निर्माते, दिग्दर्शक सुबोध खानोलकर म्हणाले की, 'आपल्या मातीतल्या माणसांची, निसर्गाची, परंपरेची आणि इथल्या भावनांची ही गोष्ट आहे, जी भाषेच्या सीमा ओलांडून सगळ्या जगाला आपलीशी वाटू शकेल. कारण या कथेतला निसर्ग, रूढी परंपरा, माणसं आणि त्यांचे प्रश्न हे फक्त कोकण किंवा महाराष्ट्रापुरते नाहीत, ते जगभरात कमी अधिक फरकाने सारखेच आहेत.बवेश जानवलेकर यांनी 'दशावतार' चित्रपटाबद्दल सांगितल्या विशेष गोष्टी , झी स्टुडिओ मराठीचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर म्हणाले की, 'दशावतार' चित्रपटाची मला भावलेली गोष्ट म्हणजे याच्या निर्मिती प्रक्रियेत असलेली पूर्ण टीम ही ताज्या दमाची आणि नव्या विचारांची आहे अनोखा उत्साह या संपूर्ण टीममध्ये आहे. चित्रपट माध्यमाकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन या सर्वांचा आहे आणि त्याचीमालवणी संस्कृती, कोकणचा निसर्ग नेहमीच अनेका भुरळ घालतो. 'दशावतार' चित्रपटाचं पोस्टर, 'आवशीचो घो' यांनी आधीच रसिकांच्या मनात तुफान उत्सुकता निर्माण केलीय. प्रेक्षकांची ही उत्कंठा शिगेला पोहोचली असतानाच 'दशावतार' या मराठी चित्रपटाचा भव्य ट्रेलर एका शानदार समारंभात नुकताच प्रदर्शित करण्यात आला. झी स्टुडिओजची प्रस्तुती, ओशन फिल्म कंपनी आणि ओशन आर्ट हाऊसची निर्मिती असलेला 'दशावतार' चित्रपट मराठी चित्रसृष्टीत एक नवी झळाळी घेऊन अवतरत आहे.

कोकणात गणेशोत्सवाचं महत्त्व सर्वाधिक आहे. या गणेशोत्सवाप्रमाणेच कोकणात 'दशावतार' ही कलापरंपरा तितकीच महत्त्वाची आहे. म्हणूनच येत्या गणेशोत्सवाच्या पाठोपाठ अवघ्या महाराष्ट्रात 'दशावतार'चं मोठ्या दिमाखात आगमन होत आहे. ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर, महेश मांजरेकर, भरत जाधव, सिद्धार्थ मेनन, अभिनय बेर्डे, प्रियदर्शिनी इंदलकर अशी मराठी चित्रपटातील दिग्गज कलाकारांची फौज असलेला हा मल्टीस्टारर 'दशावतार' येत्या १२ सप्टेंबरला चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे.

'दशावतार 'मध्ये नेमकं आहे तरी काय, याची सर्वांनाच उत्कंठा आहे. कोकणातील इरसा माणसांचे नमुने, तिथल्या प्रथा परंपरा, दशावतारी नाट्यकला यांचा मिलाफ म्हणजे 'दशावतार' चित्रपट होय. ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**-email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)